हॉटेल जॉब-सुपरवायझर
१० वी पास/नापास ( वय वर्ष १८ पूर्ण)
१२,०००/- पगार
राहणे/जेवण/फ्री
संपर्क- पाटील ब्रदर्स हॉटेल
पांडवादेवी, पो. पोयनाड
मो.नं. ८६९८७६०००२/८६९८७६०००८
८६९८७६०००५

# कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. ४ जून २०२४

किंमत ४ ₹




## सात टप्प्यातील मतदान

| टप्पा | जागा | मतदान |
|---|---|---|
| पहिला टप्पा । १९ एप्रिल | 101 | 62.37% |
| दुसरा टप्पा। २६ एप्रिल | 89 | 61.00% |
| तिसरा टप्पा । ७ मे | 94 | 65.58% |
| चौथा टप्पा । १३ मे | 49 | 67.25% |
| पाचवा टप्पा । २० मे | 57 | 60.09% |
| सहावा टप्पा । २५ मे | 57 | 62.00% |
| सातवा टप्पा । १ जून | 57 | 60.37% |




## १८ व्या लोकसभेवर दृष्टिक्षेप

- ९६.८ कोटी मतदार
- ४९.७ कोटी पुरुष मतदार
- ४७.१ कोटी महिला मतदार
- १.८ कोटी नवमतदार
- ८८.४ लाख दिव्यांग व्यक्ती
- १९.१ लाख सेवा मतदार
- ८५ वर्षावरील ८२ लाख मतदारांनी बजावला हक्क
- ४८,००० तृतीयपंथीय मतदारांचा समावेश
- १९.७४ कोटी तरुण मतदार (२०-२९ वर्षे वयोगटातील)
- शंभर वर्षावरील २.१८ कोटी मतदार



# विजयी गुलाल कोणाचा?

- एनडीए विरुद्ध इंडिया आघाडीत थेट लढत
- निकालाची उत्सुकता शिगेला

| मुंबई | प्रतिनिधी | लोकसभा निवडणुकीच्या सात टप्प्यांतील मतदान पूर्ण झाले असून, आता उद्या मंगळवारी (दि. ४) जाहीर होणाऱ्या निकालाकडे सर्वांचे डोळे लागले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाजपप्रणीत एनडीए विरुद्ध काँग्रेसच्या नेतृत्वाखालील इंडिया आघाडीत यंदा थेट सामना पाहायला मिळाला आहे. सलग तिसऱ्यांदा आपली सत्ता आणण्यासाठी भाजपची प्रतिष्ठा पणाला लागली आहे, तर कोणत्याही परिस्थितीत भाजपा, मोदींची हुकूमशाही सत्ता उलथवून टाकण्याचा चंग इंडिया आघाडीने बांधला असून, देशभरात प्रचारादरम्यान रान पेटवल्याचे दिसून आले. दोन्ही गटाकडून आपापल्या विजयाचे दावे करण्यात येत असून, उद्या ४ जूनच्या निकालातच देशाचे संपूर्ण चित्र स्पष्ट होणार आहे. देशातील एकूण ५४३ लोकसभा जागांसाठी ८,३६० उमेदवारांचे भवितव्य उद्याच्या निकालात ठरणार आहे.

## इंडिया आघाडी

काँग्रेस, द्रविड मुनेत्र कळघम, ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस, जनता दल (संयुक्त), शिवसेना (उबाठा), मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष , राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार), समाजवादी पक्ष, जम्मू काश्मीर नॅशनल कॉन्फरन्स, इंडियन युनियन मुस्लीम लीग, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, विदुतलाई चिरुतैगल कत्छी, आम आदमी पक्ष, झारखंड मुक्ती मोर्चा, केरळ काँग्रेस, मरुमलार्ची द्रविड मुनेत्र कळघम, रेव्हल्युशनरी सोशलिस्ट पार्टी, कोंगुनाडू मक्कल देसिया कत्छी, राष्ट्रीय जनता दल, राष्ट्रीय लोक दल, अपना दल (कमेरावादी), पीपल्स डेमोक्रेटिक पार्टी, कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया मार्क्स-लेनिनिस्ट लिबरेशन, ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक, मणितनेया मक्कल कत्छी, केरळ काँग्रेस, शेकाप.

## कुठे उत्साह, कुठे धाकधूक

मतदारांमध्ये कोण निवडून येणार याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. तर दुसरीकडं उमेदवारांमध्ये काहीशी धाकधूक असली तरी आपणच निवडून येणार असाही विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. अनेक ठिकाणी आमचे साहेबच जिंकून येतील, अशा आशयाचे फलक कार्यकर्त्यांकडून झळकविण्यात येत आहेत. उद्याच्या दिवसाची कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात तयारी केल्याचे दिसून येत आहे. विजयाचा गुलाल हा आमच्या साहेबांनाच लागणार याची खात्री असल्यानं कार्यकर्त्यांमध्ये कमालीचा उत्साह मला पाहायला मिळत आहे.

## राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए)

भारतीय जनता पक्ष, शिवसेना शिंदे गट- महाराष्ट्र, राष्ट्रीय लोक जनशक्ति पार्टी, अपना दल (सोनिलाल), नॅशनल पीपल्स पार्टी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार), लोक जनशक्ती पार्टी (रामविलास पासवान), नॅशनल डेमोक्रेटिव्ह प्रोग्रेसिव्ह पार्टी, ऑल झारखंड स्टुडंट्स युनियन, सिक्कीम क्रांतिकारी मोर्चा, मिझो नॅशनल फ्रंट, नागा पीपल्स फ्रंट, इंडिजिनिअस पीपल्स, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले), आसाम गण परिषद, पत्तल्ली मक्कल कत्छी, तमीळ मनिला काँग्रेस, युनायटेड पीपल्स पार्टी लिबरल, सुहेलदेव भारतीय समाज पार्टी, शिरोमणी अकाली दल (संयुक्त), महाराष्ट्रवादी गोमंतक पार्टी, जननायक जनता पार्टी, प्रहार जनशक्ती पार्टी, राष्ट्रीय समाज पक्ष, जनसुराज्य शक्ती पार्टी, कुकी पीपल्स अलायन्स, युनायटेड डेमोक्रेटिक पार्टी, हिल स्टेट पीपल्स डेमोक्रेटिक पार्टी, निशाद पार्टी, ऑल इंडिया एन. आर. काँग्रेस, हिंदुस्तानी अवाम मोर्चा, जन सेना पार्टी, हरयाणा लोकहित पार्टी, भारत धर्म जन सेना, केरळ कामराज काँग्रेस, पुतिया तमिलगम, गोरखा नॅशनल लिबरेशन फ्रंट, ऑल इंडिया द्रविड मुनेत्र कळघम.

### लढविलेल्या जागा

भाजप 430

मित्रपक्षांना 113

काँग्रेस 328

मित्रपक्षांना 101

# रायगडमध्ये गीते की तटकरे? आज होणार फैसला



| रायगड | खास प्रतिनिधी | लोकसभा निवडणुकीचा निकाल मंगळवारी जाहीर होणार आहे. काही टीव्ही चॅनलने त्यांच्या एक्झीटपोलमध्ये भाजपाला झुकते माप देऊन टाकले आहे. मात्र, वस्तुस्थिती फारच निराळी असून, इंडिया आघाडीचा विजय होणार असल्याचे बोलले जाते. रायगड लोकसभा मतदारसंघात इंडिया आघाडीतील शिवसेनेचे (ठाकरे गट) अनंत गीते आणि महायुतीमधील राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) सुनील तटकरे यांच्या समर्थकांनी विजयी गुलाल उधळण्याची तयारी केली आहे. अनंत गीते यांचेच पारडे अधिक जड राहण्याची जास्त शक्यता असल्याने इंडिया आघाडीमध्ये कमालीची उत्सुकता आहे.

यंदाची लोकसभा निवडणूक राज्यात पाच टप्प्यांत झाली. पहिल्या टप्प्यापासून मतदानाची टक्केवारी पाहून सारेच हबकून गेले होते. त्याचा सर्वाधिक धसका भाजपाने घेतला होता. निवडणूक ज्या मुद्द्यांभोवती फिरेल, असे सत्ताधाऱ्यांना वाटत होते, तसे झाले नाही. मतदानाचा टप्पा जसजसा पुढे सरकरत गेला, तसतशी ही निवडणूक लोकांनीच कधी हाती घेतली, हे सत्ताधाऱ्यांना उमगलेच नाही. राष्ट्रीय मुद्द्यावर केंद्रित होणे अपेक्षित असताना प्रथमच ही निवडणूक मोठ्या प्रमाणावर स्थानिक मुद्द्यांवर केंद्रित झाली आणि तेथूनच सत्ताधाऱ्यांची समीकरणे चुकत गेल्याचे स्पष्ट दिसले.

अनंत गीते यांच्यासाठी दस्तुरखुद्द उद्धव ठाकरे, शरद पवार, शेकापचे सरचिटणीस आमदार जयंत पाटील, काँग्रेसचे नेते मैदानात उतरले होते. भाजपाने ठाकरे यांची शिवसेना आणि शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस फोडल्याचा राग सर्वसामान्य मतदारांमध्ये कमालीचा होता. त्यांच्या सहानभुतीचा फायदा गीतेंना झाला नाही, तर नवलच म्हणावे लागेल. तसेच ओबीसी, मराठा आरक्षण मुद्द्यांवर या समाजाची नाराजी, मुस्लिम समाजाची नाराजी, संविधान बदलण्याच्या भूमिकेमुळे दलित समाजाच्या नाराजीचा फटका तटकरेंना बसणार, असे वातावरण दिसून आले होते. तटकरेंसाठी भाजपासारखा पैशाने बलाढ्य असलेला पक्ष मैदानात होता, तसेच स्वतःच्या आर्थिक सुबत्तेमुळे तटकरे हे सक्षम असल्याचे दिसले. त्यांना महायुतीतील विद्यमान आमदारांची सोबत होती.

> नेहुली क्रीडा संकुल येथे मंगळवारी सकाळी आठ वाजल्यापासून मतमोजणीला सुरुवात होणार आहे. यासाठी प्रशासन सज्ज झालू असून, चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

लोकसभेच्या निवडणुकीत प्रामुख्याने विधानसभा म तदारसंघनिहाय कुणाला किती आघाडी मिळाली, यावर त्या भागातील विद्यमान आमदारांचा प्रभाव निश्चित होतो. युती अथवा आघाडीच्या संबंधित उमेदवारास किती मते मिळवून दिली, याचेही परीक्षण या निकालावेळी होणार आहे. काही आमदारच खासगीमध्ये कोण येणार अशी विचारणा करत असतील तर, निकाल काय लागणार हे समजण्यास सोपे आहे.

निकाल लोकसभेचा असला तरी विद्यमान आमदार भरत गोगावले, आमदार रवींद्र पाटील, योगेश कदम तसेच अलिबागच्या आमदारांमध्ये कमालीची अस्वस्था वाढल्याची चर्चा आहे. त्यांच्या उमेदवारांचा निकाल विरोधात गेल्यास या सर्वांचाच निकाल लागणार एवढे मात्र निश्चित आहे. काहींच्या मते, लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीतील समीकरणं वेगळी असू शकतात. त्यामुळे थेट असा निकष लावणे घाईघाईचे ठरेल. परंतु, असे असले तरी या निवडणुकीतील मतांच्या संख्येवर पुढील गणिते मांडली जाणार आहेत.

दरम्यान, कोण विजयी होणार आणि कोण हरणार याची हे काही अवधीतच निकाल लागल्यावर स्पष्ट होणार आहे. तोपर्यंत सर्वांचीची उत्सुकता ताणली गेली आहे.

# अनिल परब यांचा अर्ज दखल | आ. जयंत पाटील यांची उपस्थिती

| अलिबाग | प्रतिनिधी | रायगड लोकसभा मतदारसंघातील सहा विधानसभा मतदारसंघ आहेत. या प्रत्येक मतदारसंघात अनंत गीते आघाडी घेतील, असा विश्वास आहे. प्रचाराच्या दरम्यान ४० हून अधिक सभा घेतल्या आहेत. दरम्यान, राष्ट्रवादीचे नेते शरद पवार, शिवसेनेचे नेते उद्धव ठाकरे, काँग्रेसचे दिग्गज नेतेमंडळी आले. या सभांना जनतेचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला. स्वच्छ चारित्र्याचा माणूस म्हणून अनंत गीतेंकडे पाहिले जाते. त्यामुळे ते प्रचंड मतांनी निवडून येतील, असा विश्वास शेकाप सरचिटणीस आ. जयंत पाटील यांनी व्यक्त केला.

विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी मुंबईमध्ये दाखल झाले होते. त्यावेळी आ. पाटील बोलत होते. यावेळी शिवसेना (उद्धव ठाकरे गट) जिल्हा सल्लागार बबन पाटील व अन्य मंडळी उपस्थित होते.



यावेळी आ. जयंत पाटील म्हणाले, विधान परिषदेच्या निवडणुकीत अनिल परब आणि अभ्यंकर या दोघांचे अर्ज भरण्यासाठी आलो. मुंबईमध्ये महाविकास आघाडी तथा इंडिया आघाडीचे दोन्ही उमेदवार चांगल्या मतांनी निवडून येतील, अशी खात्री आहे. अभ्यंकरांनी शिक्षण क्षेत्रात चांगल्या पद्धतीने काम केले आहे. गोरगरीब मुलांना शिकविण्याचे कामही त्यांनी प्रामाणिकपणे केले आहे. त्यामुळे त्यांना शिक्षण क्षेत्रातील मंडळी चांगली साथ देतील, असा विश्वास आहे. अनिल परब हे प्रभावी, आक्रमक असून, विधिमंडळात सर्व विषयांवर बोलताना एक वकील म्हणून त्यांच्याकडे आम्ही आदराने बघतो. गेली पंधरा वर्षे ते विधिमंडळात आहेत. त्यांच्यासारखा आक्रमक नेता विधान परिषदेमध्ये येणार याचा आनंद आहे. त्यांनी मंत्रिमंडळाच्या कारकीर्दीत मंत्री म्हणून प्रभावीपणे केलेले काम न विसरण्यासारखे आहे. विधिमंडळात अशा लोकप्रतिनिधींची गरज आहे. सभागृहात बोलणारा एक चांगला वक्ता, आमदार म्हणून परब यांच्या रुपाने मिळतोय, याचा आनंद आहे.

ही लढाई जनतेने हाती घेतली असून, भाजपाच्या हुकूशाहीविरोधात जनतेमध्ये चीड आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीसह महाविकास आघाडीला चांगले यश मिळणार आहे. मुंबईच्या सर्वचच्या सर्व जागा आघाडीला मिळतील, असा विश्वास आहे. मुंबई महाविकास आघाडीच्या सोबत आहे. त्यामुळे विजय हा निश्चितच आहे, असे आ. जयंत पाटील म्हणाले.

# आज अटल सेतूवर अवजड वाहनांना बंदी

| उरण | वार्ताहर | लोकसभेच्या निवडणुका पार पडल्या असून, मंगळवारी (दि. ४) मतमोजणी होत आहे. मुंबईतील शिवडी आणि दक्षिण मुंबई मतदारसंघाची मतमोजणी शिवडी बंदर परिसरात होणार आहे. त्या ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेसाठी अडथळा निर्माण होऊ नये म्हणून मंगळवारी सकाळी सहा ते संध्याकाळी सहापर्यंत अटल सेतू वाहतूक जड-अवजड वाहनांसाठी बंद असणार आहे, तर हलक्या वाहनांची वाहतूक सुरु असली तरी त्यांना शिवडी येथे थांबता येणार नाही.

वडाळा वाहतूक विभागाच्या हद्दीत शिवडी वेअर हाऊस, हे बंदर रोड, शिवडी पूर्व मुंबई येथे ३१ दक्षिण मुंबई लोकसभा पान २ वर

# भीतीपोटी भाजपाकडून दबावतंत्र

## अमित शहांची दीडशे जिल्हाधिकाऱ्यांना धमकीचे फोन

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था | लोकसभा निवडणुकीचा मंगळवारी निकाल लागणार आहे. मतमोजणीआधी दोन दिवस सस्पेन्स वाढला आहे. एक्झिट पोलचे आकडे हवे तसे लागले असले तरी भाजपाला मनातून पराभवाची भीती वाटत आहे. त्यामुळेच भाजपकडून दबावतंत्र वापरले जात असून काँग्रेसच्या दाव्याने खळबळ उडाली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा देशातील जिल्हाधिकाऱ्यांना सातत्याने फोन करून धमक्या देत आहेत. सुमारे १५० जिल्हा दंडाधिकारी आणि जिल्हाधिकाऱ्यांना त्यांनी धमकावले आहे, असा गंभीर आरोप काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांनी केला आहे. त्यानंतर केंद्रीय निवडणूक आयोगाने रमेश यांना पत्र लिहून त्यांच्या दाव्यासंदर्भात तपशील मागितला आहे. मात्र, रमेश यांनी निवडणूक आयोगावर विश्वास नाही, असे स्पष्ट शब्दांत ठणकावून सांगितले आहे.

> **आयोगावर विश्वास नाही**
>
> जयराम रमेश यांनी पत्रकार परिषद घेऊन याबाबत माहिती दिली. काँग्रेस निवडणूक आयोगाचा आदर करते, मात्र ही संस्था आजवर ज्या पद्धतीने काम करत आहे, त्यावर विश्वास ठेवता येत नाही. निवडणूक आयोग ही घटनात्मक संस्था आहे, ती निष्पक्ष असली पाहिजे. लोक केवळ पक्ष आणि उमेदवारांवरच लक्ष ठेवत नाहीत तर निवडणूक आयोगाकडेही लक्ष देत आहेत, असे रमेश यावेळी म्हणाले.

लोकसभा निवडणुकीचा निकाल ४ जून रोजी जाहीर होणार आहे. तत्पूर्वीच, अमित शहा यांच्याकडून मतमोजणीची जबाबदारी असलेल्या जिल्हाधिकाऱ्यांना धमक्यांचे फोन जात आहेत, अशी पोस्ट जयराम रमेश यांनी सोशल मीडियावर केली. शहा यांचे हे कृत्य लज्जास्पद आहे. ४ जूनला नरेंद्र मोदी, अमित शहा आणि भाजपची सरकारमधून एक्झिट होऊन इंडिया आघाडीचा विजय होईल. त्यामुळेच भाजप नेते हताश होऊन निवडणूक अधिकाऱ्यावर दबाव आणत आहेत, मात्र अधिकाऱ्यानी त्या दबावाला न जुमानता संविधानाचा मान राखला पाहिजे. कारण देशातील पान २ वर

# वर्षभरातच बंधार्‍याची दुरवस्था

## शासनाचा लाखो रुपयांचा निधी वाया



**। सुधागड-पाली । वार्ताहर ।**

**सुधागड तालुक्यातील खडसांबळे येथील नदीवरील अवघ्या एक वर्षापूर्वी बांधण्यात आलेला बंधार्‍याची पूर्णतः दुरवस्था झाली आहे. पाण्याची साठवण व्हावी, उन्हाळ्यात पाणीटंचाई उद्भवू नये यासाठी बांधण्यात आलेल्या बंधार्‍याचे बांधकाम एका वर्षात कोसळून बंधार्‍याच्या खालील बांधकाम एकाच पावसाळ्यात वाहून जाऊन बंधारा पूर्णतः तुटला आहे. त्यामुळे यावर्षी पाण्याची साठवण झाली नाही. परिणामी, पाणीटंचाईला नागरिकांना सामोरे जावे लागले. तसेच शासनाचा लाखो रुपयांचा निधीदेखील वाया गेला आहे.**

पुन्हा अशी परिस्थिती उद्भवू नये यासाठी संबंधित ठेकेदारावर निकृष्ट दर्जाचे काम केल्याबद्दल कारवाई करून तो बंधारा पुन्हा बांधण्यात यावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. निकृष्ट दर्जाच्या कामामुळे बंधारा कोसळून गेला असून बंधारा खालील बांधकाम वाहून जाऊन संपूर्ण बंधारा कोसळून गेला आहे. ठेकेदाराने निकृष्ट दर्जाचे काम केल्याने खडसांबळे येथील बंधार्‍यात पाणी साठवण होत नाही. परिणामी बंधार्‍याचा तेथील ग्रामस्थांना, जनावरांना उपयोग झाला नाही. शासनाने याकडे गंभीरतेने तात्काळ लक्ष देऊन संबंधित ठेकेदारावर कारवाई करावी व पुन्हा सुसज्ज असा बंधारा बांधावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

> **अशा निकृष्ट दर्जाच्या कामाबद्दल संबंधित खात्याचे अधिकारी व ठेकेदार यांची बैठक घेणार आहे. त्यांना या निकृष्ट दर्जाच्या कामाची विचारणा करून संबंधित कामाची पाहणी करून मग ठेकेदारावर कारवाई करण्यात येईल.**
> **– लता मोहिते, गटविकास अधिकारी, पाली – सुधागड**

### तरुणाचा जीव वाचला

**खडसांबळे येथील निकृष्ट दर्जाच्या बंधारा कोसळून बंधार्‍याला मोठं मोठे भगदाड पडले आहेत. त्यामुळे तेथे नदीवर पोहत असताना एक मुलगा त्या कोसळून पडलेल्या भगदाडामध्ये अडकला होता. सुदैवाने त्याचा जीव वाचला. मात्र पुन्हा अशी जीवघेणी घटना घडू नये म्हणून लवकरात लवकर बंधारा पूर्णतः सुसज्ज बंधने गरजेचे आहे.**

### बहिणीसोबत सापडल्याने
# तरुणाचा खून

**पनवेल :** बहिणीसोबत एकत्र सापडलेल्या एका तरुणाचा खून झाल्याची घटना तळोजा गावात घडली आहे. समीर शेख असे मृत तरुणाचे नाव असून, मुलीचा भाऊ आणि त्याच्या वडिलाने या तरुणाला बेदम मारहाण केली. देवीचा पाडा येथे राहणारा समीर हा रविवारी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास त्याची मैत्रीण आलिया शेख हिला भेटण्यासाठी तिच्या घरी गेला होता. यादरम्यान आलियाचा भाऊ ताहीर कामावरुन घरी परत आला. परंतु, आलियाने दरवाजा न उघडल्याने त्याला संशय आला. काही मिनिटे दरवाजा ठोठावल्यानंतर त्याने दरवाजावर लाथा मारून दरवाजा उघडला. घरात प्रवेश केल्यावर ताहीरला आलिया व समीर एकत्र दिसल्याने त्याने वडील युसूफ यांना घरी बोलावून घेतले. युसूफ घरी आल्यावर समीरला घरातील लोखंडी फावड्याने बापलेकांनी जबर मारहाण केली. युसूफने लोखंडी कोयत्याने समीरच्या डोक्यात प्रहार केला. या मारहाणीत समीरचा मृत्यू झाला. यादरम्यान या प्रकरणानंतर तळोजा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाथ काळदाते यांनी घटनास्थळी भेट देऊन हत्येचा गुन्हा युसूफ व ताहीर यांच्यावर नोंदविला आहे.

# मतमोजणीची रंगीत तालीम

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीचा निकाल मंगळवारी जाहीर करण्यात येणार आहे. यासाठी मतमोजणीची रंगीत तालीम सोमवारी संपन्न झाली. त्याचप्रमाणे मतमोजणीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या मनुष्यबळाची द्वितीय सरमिसळ (रँडमायझेशन) निवडणूक निरीक्षक संजीव कुमार झा, मतमोजणी निरीक्षक कमलेश कुमार अवस्थी आणि रायगड लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी किशन जावळे यांच्या उपस्थितीत सोमवारी नेहुली येथील क्रीडा संकुलातील हॉलमध्ये संपन्न झाली.

यामध्ये मतमोजणीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या सूक्ष्म निरीक्षक, मतमोजणी पर्यवेक्षक, मतमोजणी सहाय्यक यांचा समावेश होता. मतमोजणीसाठी प्रत्येक विधानसभा मतदारसंघनिहाय सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, अतिरिक्त सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, इतर अधिकारी, सूक्ष्म निरीक्षक, मतमोजणी पर्यवेक्षक, मतमोजणी सहाय्यक, तालिका कर्मचारी, शिपाई, हमाल, इतर कर्मचारी असे एकूण एक हजार अधिकारी, कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत.

**मतमोजणी प्रक्रियेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये याकरिता पोलीस प्रशासनातर्फे चोख बंदोबस्त नेमण्यात आलेला असून, त्याकरिता अपर पोलीस अधीक्षक–१, उपविभागीय पोलीस अधिकारी–३, पोलीस निरीक्षक–६, सहायक पोलीस निरीक्षक–२३, पोलीस अंमलदार–१६९, साध्या गणवेशातील पोलीस–१५, वाहतूक पोलीस–१९, आरसीपी प्लाटून–१, एसआरपीएफ प्लाटून–१, सीआरपीएफ प्लाटून–१ असा बंदोबस्त नेमण्यात आलेला आहे.**

> **नेहुली येथील क्रीडा संकुलात मतमोजणीची रंगीत तालीम घेण्यात आली. सर्व मतमोजणी अधिकारी आणि कर्मचारी यांनी घ्यावयाची दक्षता, कामाकाजाचा प्रोटोकॉल यांसह सर्व आवश्यक बाबींचे प्रशिक्षण आणि सराव यावेळी करण्यात आला. निवडणूक यशस्वी करण्यासाठी सर्वजण अतिशय प्रामाणिकपणे काम करत आहेत. जिल्हा प्रशासनाने चांगली तयारी केली असून, भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशप्रमाणे सर्व कार्यवाही करावी, असे निवडणूक निरीक्षक संजीव कुमार झा यांनी सांगितले.**

### मोबाईल नेण्यास मनाई

**निवडणुकीच्या मतमोजणीची फेरीनिहाय आकडेवारी मतमोजणी केंद्राच्या ठिकाणाहून ध्वनीक्षेपकाद्वारे वेळोवेळी घोषित केली जाईल. मतमोजणी केंद्रामध्ये उमेदवार, निवडणूक प्रतिनिधी तसेच मतमोजणी प्रतिनिधी यांना मोबाईल, पेजर, कॅलक्यूलेटर, टॅब, इलेक्ट्रॉनिक रिस्ट वॉच आदी इलेक्ट्रॉनिक्स वस्तू सोबत बाळगण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. मतमोजणी प्रतिनिधी, उमेदवार व निवडणूक प्रतिनिधी यांनी संपूर्ण मतमोजणी प्रक्रियेदरम्यान वैध ओळखपत्र परिधान करणे आवश्यक आहे. कुठल्याही अनधिकृत व्यक्तीला मतमोजणी कक्षात प्रवेश दिला जाणार नाही.**

# सलमान खान हत्या कट प्रकरण; आणखी एका आरोपीला अटक

**। पनवेल । वार्ताहर ।**

सलमान खान हत्याकट प्रकरणात आणखी एका आरोपीला अटक करण्यात आली. दिपक हवासिंग गोगालिया उर्फ जॉनी वाल्मिकी (३०, रा. ग्राम तिग्रणा ठाणा, भिवानी, हरियाणा) याला पनवेल शहर पोलिसांनी भिवानी, हरियाणा येथून हरियाणा पोलिसांच्या मदतीने ताब्यात घेतले आहे.



सिनेअभिनेते सलमान खान याला जिवे ठार मारण्याचा कट रचणार्‍या लॉरेन्स बिश्नोई व गोल्डी ब्रार गँगमधील साथीदार यांना पनवेल शहर पोलीस ठाणे, नवी मुंबई पोलीस यांनी अटक केली आहे. दिपक हवासिंग गोगालिया उर्फ जॉनी वाल्मिकी याला अटक करण्यात आली. त्याने या कटात बाहेरून येणार्‍या आरोपींची राहण्याची व गुन्हा करण्यासाठी वापरणार असलेल्या वाहनांची व्यवस्था करणार असल्याबाबत सहभाग घेतला होता. पोलीस उपायुक्त विवेक पानसरे यांनी त्याच्या वास्तव्याबाबत भिवानी पोलीस अधीक्षक वरूण सिंघला यांनी माहिती कळविली असता त्यांनी भिवानी क्राईम ब्रँचचे पोलीस निरीक्षक रवींद्र व त्यांच्या पथकाला नेमून जॉनी वाल्मिकी याला ताब्यात घेतले.

### राष्ट्रपतींच्या भेटीनंतर प्राणी बंदिस्त करण्याची प्रथा
# रायगडावर प्रशिक्षितांअभावी पशुंची हेळसांड
## पशुवैद्यकीय अधिकारी, कर्मचारीच पार पाडतात जबाबदारी

**। महाड । वार्ताहर ।**

सन २०२१ मध्ये तत्कालीन राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांचे स्वराज्याची राजधानी किल्ले रायगडवर आगमन झाले होते. जवळपास तब्बल ३५ वर्षांनंतर राष्ट्रपतीपदाची गरिमा असलेली व्यक्ती ही रायगडावर येत असल्यामुळे त्यांच्या सुरक्षिततेबाबत अत्यंत चोख सुरक्षाव्यवस्था त्यावेळी ठेवण्यात आली होती. या सुरक्षिततेच्या कारणास्तव परिसरातील भटके श्वान आणि गुरे यांनादेखील त्यांचा दौरा पूर्ण होईपर्यंत पकडून बंदिस्त करून ठेवण्यात आले होते. अशावेळी प्रशासनाने घेतलेली खबरदारी परिस्थितीनुसार योग्य होती. या दौर्‍यानंतर अशा पद्धतीची जणू काही प्रथाच पडली असल्याचे आता दिसून येत आहे.



येत्या ६ आणि २० जून रोजी किल्ले रायगडावर शिवराज्याभिषेक दिन सोहळा साजरा होत आहे. यानिमित्ताने गडावर अनेक महत्त्वाच्या आणि अतिमहत्त्वाच्या व्यक्ती येण्याची शक्यता असल्याने पुन्हा प्रशासनाने या परिसरातील श्वान पकडण्याचा आणि भटकी गुरे बंदिस्त करण्याचा हुकूम काढला असून, ही जबाबदारी पशुवैद्यकीय खात्यास देण्यात असल्याचे समजते आहे. वास्तविक, श्वानांना पकडण्यासाठी महानगरपालिका, नगरपरिषद ज्या पद्धतीने प्रशिक्षित श्वान पकडणार्‍या कर्मचार्‍यांचा वापर करते, त्याच धर्तीवर किल्ले रायगड परिसरातदेखील अशा पद्धतीनेच काम करणे उचित ठरले असते; परंतु याबाबतीत मात्र प्रशासन गंभीर नसून, तोकड्या उपलब्ध पर्यायाचा वापर करीत पशुवैद्यकीय खात्यातील अधिकारी व कर्मचार्‍यांनाच ही जबाबदारी पार पाडावी लागणार आहे. यामध्ये या पशुंची आणि श्वानांची प्रचंड हेळसांड होणार असून, त्यांचा चारा तसेच खाण्यापिण्याचा व आरोग्याचा प्रश्नदेखील उद्भवणार आहे.

वास्तविक पाहता, किल्ले रायगडावर राज्याभिषेक सोहळा हा वर्षानुवर्षे होत आहे; परंतु आजपर्यंत कधीही अशा पद्धतीने भटके श्वान अथवा गुरे पकडण्याची गरज भासली नव्हती, मग आत्ताच हा उद्योग का? मागील राष्ट्रपती दौर्‍याच्या निमित्ताने आपण समजू शकतो की, मोठ्या प्रमाणावर सुरक्षा व्यवस्था तैनात असते आणि त्यांचे काही सुरक्षा निकष असतात, त्या पद्धतीने कार्यवाही करावी लागते.

पान १ वरुन

# आज अटल सेतूवर अवजड वाहनांना बंदी

मतदारसंघ व ३० दक्षिण मध्य मुंबई लोकसभा मतदारसंघाचा स्ट्रॉंग रूम आहे. चार जून रोजी या ठिकाणी मतमोजणी असल्याने मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते जमा होण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था सुरक्षेच्या दृष्टीकोनातून अटल सेतू शिवडीबाहेर जाण्याचा मार्ग (एक्झिट) येथे कोणत्याही प्रकारची अवजड वाहने तसेच मालवाहतूक करणारी वाहने यांना अटल सेतू दक्षिण वाहिनी येथून येण्यास मनाई करण्यात आली आहे. या मार्गावर हलकी वाहने येण्यास परवानगी असेल. परंतु, त्यांना शिवडी एक्झीट येथे उतरण्यास मनाई करण्यात आली असून, त्यांना थेट कुलाबा एक्झीट व वडाळा एक्झीट येथून पर्यायी मार्गाने वाहतूक करण्यास परवानगी आहे.नवी मुंबई एमटीएनएल दक्षिण वाहिनी ते शिवडीबाहेर जाण्याचा मार्ग (एक्झीट) वाहतुकीसाठी पर्यायी मार्ग अवजड वाहनासाठी पर्यायी मार्ग नवी मुंबई वाशी खाडी पूलमार्गे, तर हलक्या वाहनांसाठी पर्यायी मार्ग-कुलाबा बाहेर जाण्याचा मार्ग (एक्झीट) व वडाळा बाहेर जाण्याचा मार्ग (एक्झीट) असणार आहे. सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना ही इतर जीवनावश्यक वस्तू वाहून नेणारी वाहने तसेच पोलीस वाहने, अग्निशमन बंब, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

# भीतीपोटी भाजपाकडून दबावतंत्र

जनता त्यांच्यावरही लक्ष ठेवून आहे, असे रमेश यांनी त्या पोस्टमध्ये म्हटले होते. निवडणूक आयोगाने रमेश यांना पत्र लिहून त्यांच्या दाव्याशी संबंधित तपशील देण्यास सांगितले आहे. अमित शहा यांनी कोणत्या १५० जिल्हाधिकाऱ्यांना फोन केले त्याची माहिती आयोगाने मागितली. राष्ट्रीय पक्षाचे जबाबदार, अनुभवी आणि ज्येष्ठ नेते असल्याने तुम्ही तथ्ये आणि माहितीच्या आधारे मतमोजणीच्या तारखेपूर्वी असे विधान केले आहे, अशा विधानांमुळे या प्रक्रियेवर संशय निर्माण होतो. त्यामुळे तपशील मिळाल्यास योग्य कारवाई करता येईल, असे आयोगाने पत्रात म्हटले होते.

# कोकण पदवीधर निवडणूक काँग्रेसकडून रमेश किर यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**। पनवेल । वार्ताहर ।**

राज्याच्या विधान परिषदेतील मुंबई पदवीधर मतदारसंघ, मुंबई शिक्षक मतदारसंघ, नाशिक शिक्षक मतदारसंघ आणि कोकण पदवीधर मतदारसंघातील चार जागांकरिता जून महिन्याच्या २६ तारखेला निवडणुका होत आहेत. सोमवार, दि. ३ जून रोजी काँग्रेसकडून रमेश कीर यांनी कोकण विभाग पदवीधर मतदारसंघातून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. काँग्रेस चार जागांपैकी दोन ठिकाणी लढणार असल्याची माहिती नुकतीच काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिली होती.

सोमवारी रमेश कीर यांनी कोकण विभागीय आयुक्त यांच्याकडे अर्ज दाखल केला. यावेळी त्यांच्यासमवेत माजी खासदार हुसेन दलवाई, ज्येष्ठ काँग्रेस नेते आबा दळवी, राजेश शर्मा, पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुदाम पाटील उपस्थित होते. या निवडणुकीसाठी ३१ मे रोजी अधिसूचना जारी करण्यात आली. ७ जूनपर्यंत उमेदवारांना अर्ज दाखल करता येणार आहेत. उमेदवारांनी दाखल केलेल्या अर्जांची छाननी १० जून रोजी केली जाईल.

उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत १२ जून आहे. २६ जून रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत या चारही मतदारसंघांकरिता मतदान होईल. सोमवार १ जुलै २०२४ रोजी मतमोजणी होईल. ही संपूर्ण प्रक्रिया ५ जुलै रोजी पूर्ण होणार आहे. संबंधित मतदारसंघात आदर्श आचारसंहिता लागू झालेली आहे.

३१ मेपर्यंत ऑफलाइन आणि ऑनलाईन पद्धतीने दाखल केलेल्या अर्जांची मतदार म्हणून नोंदणी केली जाणार आहे. ७ जून रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल.


## जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही याखालील लिखित अनुसूचीमध्ये अधिक स्वरूपात वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (यापुढे 'मालमत्ता' असे उल्लेखित) संदर्भामध्ये जयेंद्र सदानंद पेढवी, राजेंद्र सदानंद पेढवी, सुहासिनी संदीप भोईर, निखील विकास दिवकर, निकिता संदेश दिवकर, निकेश विकास दिवकर, निकेश विकास दिवकर, कलावती विशाल धाके ('मालक') यांचे मालकी हक्क तपासत आहोत, जसे आमचे अशिल हे मालकांकडून सदर मालमत्ता खरेदीसाठी इच्छुक आहेत.

सर्व किंवा कोणत्याही व्यक्तीला सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्य काही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं; वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, तसा दावा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल आणि जरी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप कायद्यात किंवा अन्यथा अस्तित्वात असल्यास, दावेदारांनी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप रद्द केल्याचे मानण्यात येईल आणि/किंवा तसा दावा, मागणी किंवा आक्षेपाचा कोणताही हक्क त्याग केला असे समजण्यात येईल आणि कोणताही असा दावा, मागणी किंवा आक्षेप आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही आणि आमचे अशिल वर नमूद केल्याप्रमाणे सदर मालमत्तेसंदर्भात खरेदीव्यवहार करू शकतात.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-सुरेखार, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित

भूमापन क्रमांक व उपविभाग २८, एकूण क्षेत्र ०-६४-७० (हे.आर.चौ.मी.) आकार ६ रू. ७५ पै.

**ठिकाण : अलिबाग**
**दिनांक : ०४/०६/२०२४**
झुंजारराव आणि कं. करीता
सही/-
विक्रांत झुंजारराव


[redacted]


## जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही याखालील लिखित अनुसूचीमध्ये अधिक स्वरूपात वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (यापुढे 'मालमत्ता' असे उल्लेखित) संदर्भामध्ये मनोहर रघुनाथ पाटील, सरीता रामनाथ कडवे, अनिता अनंत पाटील, सुगंधा संजय गावंड, सतेज शरद भगत, तेजस शरद भगत, ('मालक') यांचे मालकी हक्क तपासत आहोत, जसे आमचे अशिल हे मालकांकडून सदर मालमत्ता खरेदीसाठी इच्छुक आहेत.

सर्व किंवा कोणत्याही व्यक्तीला सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्य काही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं; वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, तसा दावा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल आणि जरी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप कायद्यात किंवा अन्यथा अस्तित्वात असल्यास, दावेदारांनी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप रद्द केल्याचे मानण्यात येईल आणि/किंवा तसा दावा, मागणी किंवा आक्षेपाचा कोणताही हक्क त्याग केला असे समजण्यात येईल आणि कोणताही असा दावा, मागणी किंवा आक्षेप आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही आणि आमचे अशिल वर नमूद केल्याप्रमाणे सदर मालमत्तेसंदर्भात खरेदीव्यवहार करू शकतात.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-सुरेखार, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित

भूमापन क्रमांक व उपविभाग ४६, एकूण क्षेत्र ०-३४-५० (हे.आर.चौ.मी.) आकार ४ रू. ६२ पै.

**ठिकाण : अलिबाग**
**दिनांक : ०४/०६/२०२४**
झुंजारराव आणि कं. करीता
सही/-
विक्रांत झुंजारराव



## जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही याखालील लिखित अनुसूचीमध्ये अधिक स्वरूपात वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (यापुढे 'मालमत्ता' असे उल्लेखित) संदर्भामध्ये जयराम अर्जुन थळे, प्रभाकर अर्जुन थळे, हरिश्चंद्र अर्जुन थळे, सुलोचना गजानन पाटील, शालिनी कृष्णा शेडगे, जगदीश लक्ष्मण शेडगे, शिला नागेश कोळी, प्रणाली प्रकाश अष्टमकर ('मालक') यांचे मालकी हक्क तपासत आहोत, जसे आमचे अशिल हे मालकांकडून सदर मालमत्ता खरेदीसाठी इच्छुक आहेत.

सर्व किंवा कोणत्याही व्यक्तीला सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्य काही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं; वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, तसा दावा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल आणि जरी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप कायद्यात किंवा अन्यथा अस्तित्वात असल्यास, दावेदारांनी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप रद्द केल्याचे मानण्यात येईल आणि/किंवा तसा दावा, मागणी किंवा आक्षेपाचा कोणताही हक्क त्याग केला असे समजण्यात येईल आणि कोणताही असा दावा, मागणी किंवा आक्षेप आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही आणि आमचे अशिल वर नमूद केल्याप्रमाणे सदर मालमत्तेसंदर्भात खरेदीव्यवहार करू शकतात.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-सुरेखार, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित

भूमापन क्रमांक व उपविभाग २४, एकूण क्षेत्र ०-४३-२० (हे.आर.चौ.मी.) आकार ५ रू. ८७ पै.

**ठिकाण : अलिबाग**
**दिनांक : ०४/०६/२०२४**
झुंजारराव आणि कं. करीता
सही/-
विक्रांत झुंजारराव



## जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही याखालील लिखित अनुसूचीमध्ये अधिक स्वरूपात वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (यापुढे 'मालमत्ता' असे उल्लेखित) संदर्भामध्ये शरद रामकृष्ण थळे, श्रीनिवास रामकृष्ण थळे, विलास रामकृष्ण थळे, प्रिया गणेश पाटील ('मालक') यांचे मालकी हक्क तपासत आहोत, जसे आमचे अशिल हे मालकांकडून सदर मालमत्ता खरेदीसाठी इच्छुक आहेत.

सर्व किंवा कोणत्याही व्यक्तीला सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्य काही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं; वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, तसा दावा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल आणि जरी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप कायद्यात किंवा अन्यथा अस्तित्वात असल्यास, दावेदारांनी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप रद्द केल्याचे मानण्यात येईल आणि/किंवा तसा दावा, मागणी किंवा आक्षेपाचा कोणताही हक्क त्याग केला असे समजण्यात येईल आणि कोणताही असा दावा, मागणी किंवा आक्षेप आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही आणि आमचे अशिल वर नमूद केल्याप्रमाणे सदर मालमत्तेसंदर्भात खरेदीव्यवहार करू शकतात.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-सुरेखार, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित

भूमापन क्रमांक व उपविभाग ४९, एकूण क्षेत्र ०-०८-६० (हे.आर.चौ.मी.) आकार १ रू. १२ पै.

**ठिकाण : अलिबाग**
**दिनांक : ०४/०६/२०२४**
झुंजारराव आणि कं. करीता
सही/-
विक्रांत झुंजारराव



## जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही याखालील लिखित अनुसूचीमध्ये अधिक स्वरूपात वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (यापुढे 'मालमत्ता' असे उल्लेखित) संदर्भामध्ये तारामती मंगळ भोईर ('मालक') यांचे मालकी हक्क तपासत आहोत, जसे आमचे अशिल हे मालकांकडून सदर मालमत्ता खरेदीसाठी इच्छुक आहेत.

सर्व किंवा कोणत्याही व्यक्तीला सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्य काही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं; वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, तसा दावा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल आणि जरी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप कायद्यात किंवा अन्यथा अस्तित्वात असल्यास, दावेदारांनी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप रद्द केल्याचे मानण्यात येईल आणि/किंवा तसा दावा, मागणी किंवा आक्षेपाचा कोणताही हक्क त्याग केला असे समजण्यात येईल आणि कोणताही असा दावा, मागणी किंवा आक्षेप आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही आणि आमचे अशिल वर नमूद केल्याप्रमाणे सदर मालमत्तेसंदर्भात खरेदीव्यवहार करू शकतात.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-सुरेखार, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित

भूमापन क्रमांक व उपविभाग ३२, एकूण क्षेत्र ०-१२-४० (हे.आर.चौ.मी.) आकार ० रू. ९४ पै.

**ठिकाण : अलिबाग**
**दिनांक : ०४/०६/२०२४**
झुंजारराव आणि कं. करीता
सही/-
विक्रांत झुंजारराव



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल निलोफर हमीद अब्दुल सुक्कुर ह्या खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तीचे विद्यमान मालक सादिया शारिक खरबे यांचे कडून विकत घेण्याचे ठरवीले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे. कळंब, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| १३६ | १ | ०-४०-०० | ३-८३ |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसीद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कळावे
दि. ०४/०६/२०२४.

**ॲड. सुमित दत्तात्रेय कराळे.**
पत्ता-ममदापुर नेरळ
ता. कर्जत, जि. रायगड
मो.-९१६८९७८४३८.

# पर्यटकांचा अतिउत्साहीपणा

## अलिबाग पोलिसांचे दुर्लक्ष; नियमांचे उल्लंघन करीत वाहने समुद्रालगत

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**अलिबाग तालुक्यातील वेगवेगळ्या समुद्रकिनारी पर्यटकांची वर्दळ आहे. मात्र काही पर्यटकांच्या अतिउत्साहीपणाचा फटका स्थानिकांना बसत आहे. नागाव समुद्रकिनारी काही पर्यटकांनी नियमांचे उल्लंघन करीत समुद्रालगत वाहने उभी केली. त्यामुळे समुद्रकिनारी फिरणाऱ्या पर्यटकांसह स्थानिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला. परंतु, अलिबाग पोलीस ठाण्याकडून याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.**



अलिबाग, नागाव, आक्षी पर्यटकांच्या पसंतीला उतरणारे समुद्रकिनारे आहेत. सुट्टीच्या दिवशी या समुद्रकिनारी पर्यटकांची मोठी गर्दी होते. त्यामुळे पर्यटकांनी हे किनारे फुलून जातात. समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांसहस्थानिकांची वर्दळ असते. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने या किनाऱ्यावर चारचाकी वाहनांना अलिबाग पोलिसांनी बंदी घातली आहे. रविवारी सुट्टीचा आनंद पर्यटक समुद्रकिनारी लुटत होते. दरम्यान काही पर्यटकांनी त्यांची चारचाकी वाहने किनाऱ्यावर उभी केली होती. त्या ठिकाणी पर्यटक मौजमजा करीत होते.

मात्र किनाऱ्यावर नियमांचे उल्लंघन करीत वाहने उभी करणाऱ्यांवर अलिबाग पोलिसांचे दुर्लक्ष असल्याचे समोर आले. किनाऱ्यावर पर्यटक असताना त्याठिकाणी पोलीस कर्मचारी तैनात करण्यास अलिबाग पोलीस अपयशी ठरले आहे. पर्यटकांच्या या अतिउत्साहीपणामुळे नागरी सुरक्षेचा प्रश्न गंभीर असल्याचे बोलले जात आहे. अलिबाग पोलीस निरीक्षक बागूल याकडे गांभीर्याने लक्ष देतील का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# माथेरान रेल्वे पुन्हा होणार सुरू

**। माथेरान । वार्ताहर ।**

माथेरानच्या वैभवशाली प्रवासाचा पुन्हा एकदा पर्यटकांना अनुभव घेता यावा यासाठी मध्य रेल्वेने पुढाकार घेतला आहे. माथेरानची राणी असा लौकिक असलेल्या मिनी ट्रेनला वाफेच्या इंजिनचा साज चढवण्यात आला आहे. नुकतीच इंजिनाची यशस्वी झाले असून लवकरच ते प्रवाशांच्या दिमतीला येण्याची शक्यता आहे. वर्षभरात देश-विदेशातील लाखो पर्यटक माथेरानला भेट देतात. याठिकाणी धावणारी मिनी ट्रेन नॅरोगेज मार्गावर चालवली जाते. नेरळ-माथेरान रेल्वेमार्गाचे बांधकाम १९०४ मध्ये सुरू झाले आणि १९०७ मध्ये ही नॅरोगेज लाईन वाहतुकीसाठी खुली करण्यात आली.



अतिवृष्टीत दरड कोसळण्याचा धोका असल्याने खबरदारीचा उपाय म्हणून हा रेल्वे मार्ग बंद केला जातो. परंतु अमनलॉज ते माथेरान दरम्यानची शटल सेवा पावसाळ्यात सुरू असते. नेरळ-माथेरान येथे चालविण्यात येणाऱ्या मिनी ट्रेनचे इंजिन डिझेलवर चालते. याच इंजिनला ऐतिहासिक वाफेवर चालणाऱ्या इंजिनचा लूक देऊन या नॅरो गेज रेल्वेच्या गौरवशाली भूतकाळाचे पुनरुज्जीवन करण्यासाठी मध्य रेल्वेने एक पाऊल पुढे टाकले आहे.

मध्य रेल्वेच्या परळ कार्यशाळेतील अभियंते आणि तंत्रज्ञांचे विशेष पथक तयार करण्यात येऊन त्यांनी वाफेच्या इंजिनाचे मॉडेल तयार केले.जेणेकरून इंजिन सुरळीत चालावे आणि त्याचे ऐतिहासिक सौंदर्य अबाधित राखता यावे. हेरिटेज लूक देण्याच्या प्रक्रियेमध्ये अनेक तांत्रिक प्रक्रियांचा समावेश असून यात सध्याच्या इंजिनचे हुड काढून टाकणे, हुडसारख्या नवीन ऐतिहासिक वाफेवर चालणाऱ्या इंजिनचे उत्पादन आणि फिटिंग, सध्याच्या डिझेल इंजिनमध्ये बदल करणे, वाफेचे फिटिंग आणि ध्वनी प्रणाली आणि नवीन ऐतिहासिक हुडसह इंजिनचे पेंटिंग आणि आवश्यकतेनुसार स्टिकर्ससह सजावट करणे आदींचा समावेश करण्यात आला आहे. इंजिनमधून वाफेच्या इंजिनसारखा धूर येत असून त्याला बसवलेली शिट्टी हे याचे मुख्य आकर्षण आहे. इंजिनचे शेवटचे काम नेरळ लोकोशेड येथून पूर्ण करण्यात आले.

इंजिनची चाचणी घेण्यात आली. सकाळी साडे सातच्या सुमारास हे इंजिन नेरळ रेल्वे स्थानकातून माथेरानच्या दिशेला धावले. इंजिनला मालवाहू डबे जोडण्यात आले होते. नेरळ ते माथेरान आणि माथेरान ते नेरळ पहिल्या चाचणी परीक्षेचा टप्पा यशस्वीरीत्या पार केल्याची माहिती माथेरान रेल्वे विभागाकडून देण्यात आली आहे. आता मध्य रेल्वेचे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून चाचणी घेण्यात येईल. त्यानंतरच याला हिरवा झेंडा दाखवण्यात येणार आहे.

# यशवंत पाटील अभिष्टचिंतन सोहळा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील मुळे येथील यशवंत सखाराम पाटील यांचा शनिवारी ७५ वा अभिष्टचिंतन सोहळा पाटील कुटुंबिय व मित्रमंडळाच्या वतीने साजरा करण्यात आला. या निमित्ताने ७५ पणत्या लावून आगळ्या वेगळ्या पध्दतीने वाढदिवस साजरा केला.



यावेळी मुळे ग्रामपंचायतीचे सरपंच सुहानी पाटील, सेवानिवृत्त तहसीलदार यशवंत थळे, ग्रामपंचायत सदस्य कमळाकर पाटील, माजी सरपंच नितीन पाटील, माजी ग्रामपंचायत सदस्य रमेश पाटील, सेवानिवृत्त शिक्षक शंकर पाटील, पोलीस पाटील सागर जंगम, अरुण थळे, विलास थळे, नितीन पाटील, सेवानिवृत्त वनपरिक्षेत्र अधिकारी नामदेव पाटील, संतोष पाटील, परेश पाटील, आदेश पाटील, आशिर्वाद पाटील, साधना पाटील, निशा पाटील आदींसह पाटील परिवार आणि मित्रमंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यशवंत पाटील हे शेतकरी कामगार पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते असून त्यांनी कोकण एज्युकेशन सोसायटी या संस्थेमध्ये कर्मचारी म्हणून ४० वर्षे सेवा केली. शिक्षण, सामाजिक क्षेत्रात काम करीत असताना राजकीय क्षेत्रातदेखील त्यांनी वेगळी ओळख निर्माण केली. मुळे ग्रामपंचायतीचे उपसरपंचपासून सदस्य पर्यंतची अनेक पदे त्यांनी भूषविली आहेत.

# बॉक्साईट उत्खननामुळे वनसंपदा नष्ट

**। हरिहरेश्वर । वार्ताहर ।**

- **संतोष जाधव जाणार सर्वोच्च न्यायालयात**
- **जनहीत याचिका दाखल करणार**

श्रीवर्धन तालुक्याला निसर्गाचे मुक्त हस्ताने वरदान लाभले आहे. गेल्या काही वर्षांपासून बंद असणाऱ्या बॉक्साईट उत्खनन करणाऱ्या कंपनीला लोकप्रतिनिधींचा आणि प्रशासनाचा आशिर्वाद मिळाल्यामुळे पुन्हा तालुक्यातील या खाणीमध्ये यंत्राच्या सहाय्याने खोदकाम जोरात सुरु आहे. त्यामुळे येथील पर्यावरणाचा ऱ्हास होऊन निसर्ग संपन्न कोकण नष्ट होण्याच्या मार्गावर असून पर्यटन क्षेत्रही धोक्यात आल्यामुळे पर्यावरण प्रेमी आणि नागरीकांकडून नाराजी व्यक्त होत आहे. सामाजिक कार्यकर्ते संतोष जाधव व संदिप जाधव हे पर्यावरण संवर्धन आणि रक्षणाकरीता सर्वोच्च न्यायालयात आणि राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाकडे जनहीत याचिका दाखल करणार आहेत.

श्रीवर्धन तालुक्यातील दांडा, बागमांडले, सायगांव, केळीचीवाडी, गडबवाडी, कुरवडे, चिखलप, मेघरे, हरवित, कुडगाव या परिसरातील जागेवर एका कंपनीने गेली अनेक वर्षे बेकायदेशीरपणे बॉक्साईट मालाचे अवैध उत्खनन केले असून आताही मोठया प्रमाणात उत्खनन सुरु आहे. भरडखोल व शेखाडी तसेच इतर ठिकाणी नवीन खाणी सुरु होणार आहेत. त्याच कंपनीने आपल्या नियंत्रणाखाली इतर बोगस कंपन्यां निर्माण करुन शासनाची दिशाभूल केली आहे.

गेली कित्येक वर्षे येथील खाणींमधून उत्खनन केलेले बॉक्साईट दिघी बंदरातून परदेशात पाठवून कंपनीने या बॉक्साईट तालाची विक्री करुन त्यातून करोडे रुपयांचा नफा कंपनीने कमावला आहे. उत्खननाला विरोध होऊ नये म्हणून कंपनीकडुन लाखो रुपयांची रसद पुरवून संघर्ष दाबण्याचा प्रयत्न होत आहे. त्यामुळे या अनागोंदी कारभाराची चौकशी सरकारने करावी अशी मागणी होत आहे.

गुरुचरण, वने, ३५ सेक्शन असे शिक्के असणाऱ्या जमिनीवर सर्व नियम धाब्यावर बसवून बॉक्साईटचे उत्खनन केले असताना प्रशासनाने या अवैध उत्खननाकडे दुर्लक्ष करुन कंपनीवर गुन्हा दाखल केलेला नाही. धक्कादायक बाब म्हणजे येथील शेतकऱ्यांनी त्यांच्या जमिनीचे करार केलेले नसताना खाण परिसरातील शेतकऱ्यांच्या जमिनीवरही उत्खनन करण्यात आलेले आहे.कंपनीने येथील शेतकऱ्यांचे खोटे करार करुन घेतले आहेत. त्यामुळे झालेल्या फसवणुकीविरोधात हे शेतकरी कंपनी विरोधात न्यायालयात दाद मागणार आहेत.

खाणीतील बॉक्साईट मालाचे उत्खनन करण्याकरीता सुरुंग स्फोटकाचा वापर करण्यात येत असल्याने खाण परिसरातील घरांना तडे बसत आहेत तसेच पाण्याच्या झऱ्यांचे नैसर्गिक स्त्रोत ही गायब होऊन तीव्र पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण झाल्याने या नागरीकांना पाण्यासाठी वणवण फिरावे लागत आहे.

वातावरणात धुळीचे कण मिसळून प्रदुषणात वाढ होत असल्याने नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहेत. तालुक्यात सुरु झालेल्या या बॉक्साईड खाणींमुळे बागायती पिकांसह इतर पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले असल्याने बागायतदारांना दरवर्षी लाखो रुपयांचे नुकसान सोसावे लागत आहे.


## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **सहारा ट्रॅव्हल्स अलिबाग मध्ये** स्थानिक ड्रायव्हर पाहिजे वय २५ ते ४५( Jsw duty) ९२७०५६०४५६
- **नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे.** १. रिसेप्शन, २. लोकल जेवण बनवण्यासाठी हॉटेल लेडीज स्टाफची आवश्यकता आहे. शिफ्ट टाइमिंग दुपारी २ ते रात्री ११, २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा. (व्हॉटसअॅप वर मेसेज करावा.) ८४०८८२९५५५, ७८७५८६६५५५
- **Autocad draftsman** required in architectural firm. Location :Alibag Comtact no:9970391697
- **पहिली ते पाचवी क्लासेस** व पाळणाघर श्रीबाग नं.-२, चेंढरे, अलिबाग. संपर्क- ९८२३९२०४०३, ८१४९६६९२४६
- **अलिबाग शहरात मध्यवर्ती** ठिकाणी ३५० स्क्वे.फूट. गाळा भाड्याने देणे आहे. (बीच रोड, जुना नगरपालिकेजवळ, संपर्क - ९४२११६३१२४
- **घरकाम व मुलांना सांभाळणे** साठी बाई हवी पंतनगर अलिबाग येथे. पूर्णवेळ राहणारी किंवा सकाळी ८.००ते ६ संपर्क-९८६७२१५४९५/८०९७२०५९३९
- **अलिबाग शहराच्या जवळ** N.A.Plot आहेत. भातशेती वरकस जमिन अलिबाग रोहा रोड वर उपलब्ध. सनस्टोन रॉयल इस्टेट अलिबाग-बायपास रोड. ८६६९००६९०२/९२७०८८८८०३
- **५०००० रूपये किमतीचा CNC मशीन ऑपरेटिंगचा कोर्स मोफत,** मोफत, मोफत. पात्रता : १२ वी किंवा १५ वी पास, वयोमर्यादा- ३० वर्षे पर्यंत. पगार- १०००० रूपये, ८ तास ड्युटी, संपर्क : ९०४९६५५५२३
- **टायपिंग आणि झेरॉक्सकरीता मुले मुली पाहिजेत.** संपर्क : ९२७१५९४४२०

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# रेवदंड्यात खुलेआम मटका अन् गुटखा विक्री

**। रेवदंडा । वार्ताहर ।**

रेवदंडा पोलीस ठाणे हद्दीत बेकायदेशीर मटका खुलेआम सुरू आहेच आता गुटखा विक्री सुध्दा बिनधास्त सुरू झाली आहे.

रेवदंडा व परिसरात बेकायदेशीर मटका सुरू असून भ्रमणध्वनीच्या माध्यमातून भर रस्त्यात मटका एजंट मटक्याचे आकडे पाठवित आहेत. एकदंरीत भ्रमणध्वनीने मटका व्यवसाय पूर्वीपेक्षा तेजीत आला असून खुलेआम सुरू आहे. मटका खेळून झटपट श्रीमंत होण्याच्या नादाने अनेक युवावर्ग वाममार्गाला लागले असल्याचे चित्र आहे.

गुटखा विक्रीस पूर्णतः बंदी असताना सुध्दा रेवदंडा व परिसरात बेकायदेशीपणे गुटखा विक्री केली जात आहे. गुटखा आरोग्यास अत्यंत घातक असताना सुध्दा युवावर्ग तोंडात गुटखा ठेवीत पिचकाऱ्या भर रस्त्यात फेकत असतात. ही गुटखा विक्री चोरीछुपके होत असून नेहमीच्या ग्राहकांना गुटखा माल पुरविण्यात येतो. गुटखा खरेदी करून घरात अथवा परिसरात ठेवून त्यानंतर रस्त्यावर बेकादेशीरपणे विक्री केली जात आहे. आजूबाजूच्या सर्व शेजारी मंडळीना येथे गुटखा विक्री केली जात. खरेदीसाठी रात्रीचे ग्राहक येत असतात यांची पूर्ण माहिती असते. मात्र तरीही पोलिसांच्या नजरेत हे गुटखा विक्री करणारे का येत नाहीत? असा सवाल केला जातो आहे.







# कोणाला फसवता?

एखादा अपघात घडतो. जनता संतापते. सरकारविरुध्द चीड निर्माण होते. सरकार धावाधाव करू लागते. धडाधड कारवाई केली असे दाखवले जाते. काही दिवस जातात. प्रकरण शांत होते. विसरले जाते. ज्यांच्यावर कारवाई केली होती ते सुटून जातात. खटल्यात निर्दोष ठरतील अशी व्यवस्था होते. पुण्यातल्या अपघात प्रकरणात हेच घडते आहे का? अगरवाल बिल्डरच्या अल्पवयीन मुलाने गाडीखाली दोन जणांना चिरडले. तेव्हापासून आजपर्यंत हे प्रकरण दडपण्यासाठी जे काही घडले आहे ते अंगावर काटा आणणारे आहे. या देशात पैशांचा माज असलेल्या व्यक्ती पोलिस, डॉक्टर आणि न्यायालये इत्यादींना मॅनेज करायचा कसा प्रयत्न करतात याची जी उदाहरणे समोर आली आहेत ती भीषण आहेत. आता पोलिस सारवासारव करीत आहेत. पण अपघाताच्या रात्री आरोपी मुलाला अतिशय सौम्य वागणूक दिली गेली हे स्पष्ट आहे. त्याला पोलिस ठाण्यात पिझ्झा बर्गर खायला दिला गेला असे म्हणतात. पोलिस एरवी अशा गुन्ह्यातल्या कोणाही मुलांना वा प्रौढांनाही अतिशय वाईट वागवतात. बराच काळ बसवून ठेवतात. पोलिस ठाण्याची भीती निर्माण व्हावी असे वातावरण करतात. याउलट मुलाच्या बाबत मात्र एकदम प्रेमाची वागणूक दिली गेली. त्यानंतर तो दारू प्यायला होता की काय हे ठरवण्यासाठी रक्ताचे जे नमुने गोळा केले गेले ते डॉक्टरांपर्यंत पोचणारच नाहीत याची काळजी घेतली गेली. त्या नमुन्यांऐवजी दुसऱ्याच व्यक्तींचे रक्त तपासणीसाठी पाठवले गेले. हे रक्त मोटारीत हजर असलेल्या सर्वांच्या रक्तगटाशी जुळेल याची काळजी घेतली गेली. हे करण्यात ससूनच्या न्यायवैद्यक विभागाचा प्रमुख अजय तावरे आणि दोन अन्य डॉक्टरांचा सहभाग होता. पण अट्टल गुन्हेगारही काही ना काही चूक करतोच. रक्ताचा नमुना तपासणीस पाठवताना आरोपीच्या आईचे म्हणजे महिलेचे रक्त पाठवले गेले. अपघाती गाडीत कोणीही महिला नव्हती. रक्त तपासणी करताना महिलेचे रक्त कोठून आले असा प्रश्न निर्माण झाला.

### केवळ देखावा

एरवी हा प्रश्न दडपला गेला असता. पण मिडिया तसेच कार्यकर्ते यांनी आवाज उठवल्याने या खोट्या गोष्टींना वाचा फुटली. याच दरम्यान, अपघात झाला त्यावेळी आरोपी मुलगा नव्हे तर अगरवालचा ड्रायव्हर गाडी चालवत होता असा बनाव रचण्याचा प्रयत्न झाला. पण त्या ड्रायव्हरनेच याचा भंडाफोड केला. अपघात प्रकरणात आपली मान अडकवून घेण्याच्या बदल्यात त्याला पैसा व इतर गोष्टी देऊ करण्यात आल्या. पण तो ऐकत नाही असे लक्षात आल्यावर धमकावण्यात आले. अखेर पोलिसांना अगरवालच्या बापाला अटक करावी लागली. दरम्यान, अगरवालच्या बाकीच्या भानगडी बाहेर आल्या. महाबळेश्वर, पाचगणी भागातील हे बेकायदा हॉटेल आहे. वास्तविक हे हॉटेल तेथे अनेक वर्षांपासून आहे. मात्र प्रशासनाला एकाएकी जाग आली व ते सील करण्यात आले. त्याच्या बातम्या सतत वाहिन्यांवर झळकतील याची व्यवस्था करण्यात आली. अगरवालला चांगली अद्दल घडत आहे असे जनतेला वाटावे असा देखावा उभा करण्यात आला. काही महिन्यांनी हेच हॉटेल पुन्हा मोठ्या दिमाखात चालू होईल अशीच शक्यता अधिक आहे. तोवर लोक हे प्रकरण विसरून गेलेले असतील. ससूनमधील डॉक्टरांची भानगड उघडकीस आली तो एक अपघात होता. अपघात घडवणाऱ्या मुलाच्या रक्ताचे नमुने टाकून देऊन त्याजागी दुसऱ्या तशाच नमुन्यांची व्यवस्था करणे हे सराईतपणे घडलेले आहे. याचा अर्थ तेथील डॉक्टर्स हा प्रकार सर्रास करीत असणार. ससून हे मुंबईबाहेरच्या महाराष्ट्रातले सर्वात जुने व नामांकित इस्पितळ आहे. काही महिन्यांपूर्वी ड्रग प्रकरणातला आरोपी ललित पाटील हा ससूनमधून बिनबोभाट निसटला होता. त्यापूर्वी त्याची उत्तम बडदास्त ठेवली गेली होती. त्यामुळे एकूणच ससून हे गुन्हेगारांना संरक्षण देणारे केंद्र बनल्याचे दिसते.

### नेते आणि पैसेवाले

यातील विभागप्रमुख व इतर डॉक्टरांच्या नियुक्त्या करताना अजित पवार यांचे आमदार सुनील टिंगरे यांनी हस्तक्षेप केल्याचे दिसते. हेच टिंगरे अपघात झाला त्या पहाटे तीन वाजता घाईघाईने पोलिस ठाण्यात दाखल झाले होते. कायद्याला धरून योग्य तो तपास करा असे आपण सांगितले असे टिंगरे म्हणतात. हे सांगायला ते इतक्या अपरात्री जातीने पोलिस ठाण्यात गेले यावर शेंबडे पोरही विश्वास ठेवणार नाही. अपघात घडल्यानंतर पुण्याचे पालकमंत्री असलेले अजित पवार बराच काळ गायब होते. हा सर्वच प्रकार संशयास्पद आहे. जेव्हा एखाद्या सामान्य निरपराध माणसाला पोलिस छळत असतात तेव्हा हेच अजित पवारांसारखे राजकारणी तिकडे फिरकत नाहीत. हस्तक्षेप करत नाहीत. अगरवालसारख्या भ्रष्ट, गुंड आणि पैसेवाल्यांकडून गुन्हा झाला की मात्र यांच्या पोलिस ठाण्यामध्ये घिरट्या सुरु होतात. सरकारची वागणूकही समोरचा माणूस पाहून बदलते. त्यामुळे एकनाथ शिंदे कितीही सांगत असले तरी हे सरकार सामान्यांचे नसून बिल्डरांचे आणि दांडगटांचे आहे. अगरवाल प्रकरणात मुळात कल्याणीनगर पोलिसांनीच ताबडतोब कडक कारवाई करायला हवी होती. ती झाली नाही. कारण, अगरवालचे संबंध लक्षात घेता आपल्याला सरकारातून बड्या मंडळींचे फोन येणार हे पोलिसांनी गृहित धरलेले असणार. शिवाय, अगरवालकडून पैसे काढण्याची ही संधी आहे असे पोलिस यंत्रणेतील काही जणांना वाटले असण्याचीही शक्यता आहे. या प्रकरणाचा भारतभर गवगवा झाला आणि निवडणुकीचा काळ होता म्हणूनच आरोपींना अटक करण्याची कारवाई झाली. आता अल्पवयीन मुलाविरुध्द नेहमीप्रमाणे खटला चालवण्याची तयारी सुरू आहे. त्यात कायदेशीर अडचणी आहेत. मात्र एरवी, हे प्रकरण पोलिसांनी असेच दाबले असते. सरकारने निदान आता तरी फसवाफसवी थांबवून हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात न्यावे व संबंधितांना कडक शिक्षा होतील हे पाहावे. अगरवालसारख्या पैशांच्या जोरावर सर्व काही विकत घेता येते असे मानणाऱ्या बिल्डरांना व डॉक्टरांप्रमाणे व्यवस्थेतील विकल्या जाणाऱ्या सर्वांना जरब बसणे आवश्यक आहे.

विचार

# अपघात एक, प्रश्न अनेक

***पुण्यातील हिट अँड रन प्रकरण अनेक प्रश्नांना जन्म देणारे आहे. मुलांचा पालकांवरील वाढता दबाव, चंगळवादाच्या कळसावर पोहोचलेल्या संकल्पना, स्वत:ची ओळख महागड्या वस्तूंशी जोडण्याची अहमअहमिका हे सगळे मुद्दे या अपघाताने अधोरेखित झाले आहेत. दुसरीकडे, पालकांबरोबरच शाळा आणि सुरक्षा यंत्रणेची भूमिकाही तकलादू होत असल्याचे या घटनेने दाखवून दिले आहे. त्यासंबंधीचे हे विचारमंथन.***



**डॉ. राजेंद्र बर्वे**

पुण्यामध्ये मध्यरात्री एका अल्पवयीन मुलाने आलिशान आणि अद्याप नोंदणीही न झालेली चारचाकी अत्यंत वेगाने चालवत दुचाकीला धडक दिल्याने दोनजणांचा मृत्यू झाल्याची घटना चर्चेच्या केंद्रस्थानी राहिली. पूर्वीही या स्वरुपाचे अपघात झाले आहेत. काही काळ चर्चेत राहून ते विस्मृतीत जातात आणि तशाच स्वरुपाची एखादी दुर्घटना घडल्यानंतरच त्या स्मृती जागृत होतात. मात्र या सर्वात मुख्य प्रश्नांवर कधीच गांभीर्यपूर्वक लक्ष दिले जात नाही. त्यामुळेच प्रश्न तसाच राहतो.

अशा प्रकारे समोर येणारे प्रत्येक प्रकरण वेगळे असते. त्यामुळे सर्वांगाने विचार करुन मत नोंदवावे लागते. या पार्श्वभूमीवर ताज्या घटनेसंदर्भात मतप्रदर्शित केले तर ते एकांगी ठरण्याचा धोका आहे. वर्तमानपत्रांमध्ये प्रसिद्ध झालेल्या माहितीचा आधार घेता या मुलाच्या वागण्यामध्ये बेशिस्तपणा, उर्मटपणा असल्याचे दिसते. कदाचित याचीच एक प्रकारे त्याला नशा असावी. स्वत:च्या श्रीमंतीची, पैशाची नशा व्यक्तीच्या विवेकावर दूरगामी परिणाम करते. तशातच दारुच्या अमलाखाली हे विचार अधिक क्षीण होतात. मुळात इतक्या रात्री-बेरात्री बारमध्ये बसून मद्यप्राशन करायचे आणि वेगाने तसेच बेदरकारपणे गाडी चालवून दुसऱ्याच्या जीवाला धोका उत्पन्न करायचा, ही वर्तणूकच चुकीच्या वळणावर गेलेल्या आयुष्याची कथा समोर मांडते. यावेळी निर्भया प्रकरणाप्रमाणेच केवळ कमी वय असल्यामुळे आरोपीला वेगळी वागणूक द्यायची का, हा प्रश्न पडतो. त्यातच सध्याच्या बदलत्या काळात नेमक्या कोणत्या वयापर्यंतच्या मुलामुलींना अल्पवयीन सम जावे, या प्रश्नाचे उत्तरही शोधावे लागते. कारण आधी स्पष्ट केल्याप्रमाणे आता काळ बदलला आहे. त्यामुळेच या धारणांमध्ये आणि कायद्यामध्ये आता काही बदल करणे गरजेचे आहे.

ताज्या घटनेला कारणीभूत असलेला मुलगा अल्पवयीन असला तरी त्याला मोठ्यांचे नियम आणि निकष लावावे आणि त्याच्या या चुकीकडे कोणत्याही परिस्थितीत दया दाखवू नये, असे स्वत: मुख्यमंत्री महोदयांनी स्पष्ट करणे ही यातील एक सकारात्मक बाब म्हणावी लागेल. मात्र यासंबंधी कायदा काय सांगतो, हे पाहणे गरजेचे आहे. शेवटी कायदा सर्वांसाठी समान असतो. त्यामुळेच अशा प्रकारणांमध्ये पुढे जाण्यासाठी मुख्य प्रश्नावर सांगोपांग चर्चा होण्याची आवश्यकता आहे. अल्पवयीन मुलाच्या हातात अतिशय महागड्या आणि नव्या कोऱ्या कारची किल्ली देणे, त्याने ती मागणे ही घटना सध्याच्या वाढत्या 'पियर प्रेशर'कडे लक्ष वेधून घेते. सध्या सर्व वर्गांमध्ये स्वत:कडून पैसा, श्रीमंती दाखवण्याची प्रवृत्ती वाढली आहे. चंगळवाद वाढतो आहे. माझ्या मते ते गरीब-श्रीमंतीशी फारसा संबधित नाही, कारण सगळ्याच स्तरातील या वयाच्या मुलामुलींना चंगळ करायला आवडते. एखाद्या शेतकऱ्याच्या घरातला मुलगा मोटरसायकलची मागणी करतो, एखाद्या मध्यमवर्गीय कुटुंबातील मुलगा-मुलगी आयफोनची मागणी करतात तर कोणी उच्चवर्गीय अशा आलिशान गाड्यांचा हट्ट धरतात. मात्र या सगळ्यातील समान धागा हा की, आता पालक मुलांपुढे दबून राहताना दिसत आहेत. मुलांचा दबाव स्पष्ट दिसत आणि जाणवत आहे. एक प्रकारे घरामध्ये पालकांना ओलिस धरण्याचा हा प्रकार दिसतो.

पूर्वीच्या काळी आई-वडील मुलांवर दबाव आणायचे. आपल्या अपेक्षांचे ओझे त्यांच्यावर लादायचे. आमच्या मनासारखे केले नाही तर तुम्हाला अपेक्षित गोष्ट मिळणार नाही, अशी धमकी दिली जायची. मात्र आता बरोबर याच्या उलट स्थिती दिसते. मुलांनी एक गोष्ट मागितली तर दोन आणि दोन मागितल्या तर तीन गोष्टी समोर हजर असतात. पालकांनीच त्यांना अशी सवय लावली आहे. त्याचीच परिणिती अशा घटनांमधून समोर येते. कोणतेही साधन आपल्या सोयीसाठी असते. या अर्थाने बघता चारचाकी हे प्रवासाचे एक माध्यम आहे. मात्र त्याचा विसर पडून त्याभोवती अनेक गोष्टी रचल्या गेल्या आहेत. समाजातील पत, प्रतिष्ठा, मानसन्मान याचे द्योतक म्हणून त्याकडे पाहिले जात आहे. अशातच हट्ट करुन एखादी गोष्ट मिळते हे समजल्यानंतर मुले त्याचा अस्त्र म्हणून वापर करतात आणि तसेच वागतात. सध्या हे सर्व वर्गांमध्ये पहायला मिळते. यामागील एक महत्त्वाचे कारण म्हणजे मुलांना अशा किमती वस्तूंचे आकर्षण असते. आपले व्यक्तिमत्त्व त्याद्वारे प्रदर्शित होत असल्याचा विचार त्यांच्या मनात पक्का असतो. माझ्याकडे अमूक गाडी आहे, अमूक एक फोन मी वापरतो, अमूक एका ब्रँडचे कपडे वापरतो हे समोर मांडताना ते आपल्याकडील या वस्तूंनाच स्वत:ची ओळख समजू लागतात आणि त्याप्रती अधिक आग्रही होतात. पुढे पुढे ही स्पर्धा वाढत जाते आणि घातक ठरते.

घरात कोणत्या ना कोणत्या गोष्टीसाठी सतत आग्रही असणाऱ्या मुलांपुढे पालकही हात टेकतात आणि त्यांच्या मागण्या मान्य करतात. पण इथे आपण किती मोठी चूक करतोय, हे त्यांच्या लक्षात येत नाही. आपला मुलगा वा मुलगी एखाद्या ग्रुपबरोबर फिरल्याचे त्यांना पटत नसले तरी मुलांच्या भीतीने ते आपला नकार व्यक्त करत नाहीत. बिघडत जाणाऱ्या परिस्थितीला ही बाबही कारणीभूत आहे. पालकांनी मुलांपुढे आपली खरी मते आणि विचार मांडायलाच हवे. आपली मुले कुठे जातात, काय करतात हे पालकांना माहिती असायलाच हवे. असे असताना ताज्या प्रकरणाप्रमाणे आपला मुलगा नवी कोरी गाडी घेऊन जात असल्याचे पालक जाणत असतील आणि तरीही त्याला अडवत नसतील तर हा त्यांचाही बेदरकारपणा, बेजबादारपणा आहे, असे म्हणावे लागेल. तुला हवे ते घेऊन जा, आपल्याकडे भरपूर पैसे आहेत; तुला हवे तसे उडव, ही शिकवण असेल तर वेगळे काहीच घडणे शक्य नाही. अशा घटनांची पुनरावृत्ती टाळायची असेल तर बऱ्याच गोष्टी सावराव्या लागतील. त्यातील एक म्हणजे एखाद्या संस्थेबद्दल समाजातील प्रत्येकाला धाक असायला हवा. कायद्याचा धाक असायला हवा. एखाद्या गुन्हेगाराला पोलीस स्टेशनमध्ये पिझ्झा खाऊ घातला जात असेल, तर समाजाची दिशा किती बिघडली आहे, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. पोलिसांचा दरारा वाटला पाहिजे पण त्याच वेळी त्यांचा आधारही जाणवला पाहिजे. त्यामुळेच अशा घटना कमी करण्यासाठी पोलिसांनीही पुढाकार घेतला पाहिजे.

याची गरज लक्षात घेऊनच मध्यंतरी मुलांचे समुपदेशन करण्यासाठी आमंत्रण आले असता मी एका पोलिस ऑफिसरलाही बरोबर येण्याची विनंती केली. त्यांनी मान ठेवत कार्यक्रमाला उपस्थिती लावली आणि आम्ही दोघांनी मुलांशी एकत्र संवाद साधला. मानसशास्त्रज्ञ मानसिक बाजू सांभाळत असतील तर कायदेशीर बाजू काय आहे, हे पोलीस समजून सांगू शकतात. मोठे व्हायचे म्हणजे काय, जबाबदार नागरिक व्हायचे म्हणजे काय आणि यात याबाबत कायदा काय म्हणतो हे पालक आणि शिक्षकांबरोबरच या यंत्रणेनेही मुलांना सांगितले पाहिजे. असा सुसंवादच तरुणाईला योग्य मार्गावर ठेवू शकेल. खेरीज अशा दुर्घटना शाळा आणि महाविद्यालयांच्या जबाबदारीवरही प्रकाश टाकून जातात, कारण शिक्षण म्हणजे केवळ पाठ्यपुस्तकांची घोकंपट्टी नसते तर जगण्याचे धडे देणेही अपेक्षित असते. सध्याची शिक्षणपद्धती ही अपेक्षा पूर्ण करते की नाही, हेदेखील या निमित्ताने तपासायला हवे.

सध्या नाईट लाईफची जोरदार चर्चा आहे. ते असावे की नसावे, याबाबत विविध मते ऐकायला मिळतात. ताजी घटना या विषयाचा एक कोपराही प्रकाशित करते. माझ्या मते, सध्याच्या अनेक समस्या दिवस आणि रात्रीचे नैसर्गिक गणित न पाळण्याने उद्भवत आहेत. शेवटी निसर्गाचे एक चक्र आहे. मात्र सध्या ते तोडून-मोडून टाकले जात आहे. मुले वा त्यांचे पालकही रात्री अडीच-तीनपर्यंत जागतात आणि सकाळी दहाच्या पुढे उठतात. सगळेच कशा ना कशात तरी रमलेले असतात. हे सध्याच्या समाजाचे सगळ्यात वाईट चित्र आहे. खरे पाहता सोशल मीडियामध्ये फारसे काहीही ठेवलेले नाही. मात्र एकमेकांना भेटायला बोलावण्यासाठी, टाईमपास करण्यासाठी त्याचाच गैरवापर केला जातो आणि परिस्थिती शारीरिक आणि मानसिक अशा दोन्ही आरोग्यांसाठी हानिकारक ठरु लागते. शरीरातील अवयवांचा ऱ्हास होण्यासही ही बदलती आणि सदोष मानसिकता कारणीभूत ठरते. थोडक्यात, घटना एक असली तरी त्या अनुषंगाने अनेक घटक चर्चेत येतात. त्यावर तितक्याच गांभीर्यपूर्वक चर्चा व्हायला हवी, कारण ती झाली आणि तितक्याच गांभीर्यपूर्वक ऐकली तरच कदाचित पुन्हा अशा घटनांची वार्तांकने वाचायला मिळणार नाहीत. अन्यथा, परिस्थिती आणखी बिघडत जाईल, हे तो सूर्यप्रकाशाइतके सत्य आहे.

आजकाल

# जनतेने लढवलेल्या निवडणुकीबाबतचा अंदाज

| NDA | INDIA | OTHERS |
|---|---|---|
| 237 - 250 | 220 - 245 | 55 - 70 |

| BJP | NDA ALLIES | CONGRESS | INDIA ALLIES | OTHERS |
|---|---|---|---|---|
| 212 - 220 | 25 - 35 | 110 - 125 | 100 - 120 | 55 - 70 |

**तुषार गायकवाड**

सन २०२४ची सार्वत्रिक लोकसभा निवडणूक कोणत्याही प्रकारे सत्ताधारी मोदी-शहांच्या विरोधात जाईल असे चित्र नव्हते. पण निवडणूक जाहीर झाली आणि जनतेने निवडणूक हाती घेतल्याचे चित्र दिसू लागले. विरोधात असलेल्या इंडिया आघाडीतील सर्वात मोठा पक्ष असलेल्या काँग्रेस पक्षाची बँक खाती आयकर विभागाने गोठवली. झारखंड आणि दिल्लीचे मुख्यमंत्री तुरुंगात पाठवले.

अशा परिस्थितीत 'अब की बार चारसौ पार' ही घोषणा अमित शहांनी केली खरी! पण या घोषणेला खऱ्या अर्थाने कोणी चूड लावला असेल तर तो कर्नाटक भाजपचे मोदी परिवार सदस्य अनंतकुमार हेगडे आणि प्रज्वल रेवण्णा या दोघांनी!! काँग्रेस पक्षाने क्रांतिकारी जाहीरनामा प्रसिध्द केला. काँग्रेसचा जाहीरनामा काँग्रेसने जितका घरोघरी पोहोचवला नाही. तितका काळजीवाहू पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसचा जाहीरनामा घरोघरी पोहोचवला.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांना वार्षिक १ लाख रुपये, आशा-अंगणवाडी सेविकांचे मानधन दुप्पट, ३० लाख पदांची प्रलंबित केंद्र सरकारी नोकरभरती, अ‍ॅप्रेंटीसशिपची ग्यारंटी, किमान हमीभावाचा कायदा वगैरे काँग्रेसची आश्वासने जनतेला विश्वासार्ह वाटली. भाजपच्या विरोधातील रोष रोखण्यासाठी देशभरातील विद्यमान ३०३ खासदारांपैकी भाजपाने १०१ जणांची तिकीटे कापली. त्याजागी इतर चेहऱ्यांना संधी दिली. याशिवाय ३०३ चे बहुमत टिकवण्यासाठी देशभरातील ११९ लोकसभा मतदारसंघातील मतदारांची नावे मोठ्या प्रमाणावर मतदार यादीतून वगळण्यात आली. काळजीवाहू पंतप्रधानांनी एकाही सभेत भाजपाचा जाहीरनामा, तथाकथित विकास, रोजगार, महागाई, पायाभूत सुविधा, शेतकरी, महिला यांवर चकार शब्द काढला नाही. दलित व मुस्लीम मतदान इंडिया आघाडीच्या पारड्यात जाण्याची शाश्वती झाल्यावर मोदी हेच परमेश्वर असल्याचे सांगितले गेले. जगन्नाथपूरीचा भगवान जगन्नाथ हादेखील मोदीभक्त असल्याचा दावा केला गेला. ज्यामुळे भाजपा बॅकफूटवर गेली. गोदी मेडीयातीन एक्झिट पोलचे आकडे गुजरात, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, बिहार, झारखंड, राजस्थान या राज्यांत भाजपला पैकीच्या पैकी जागा पकडल्या तरीही भाजपाला ३०३ + जाताना दिसत नाहीत. जमिनी वास्तव भाजपा वैयक्तीक संख्याबळावर संपूर्ण बहुमत गाठू शकत नसल्याचेच आहे. एनडीए मधील घटकपक्ष गेल्या १० वर्षांत भाजपनेच संपवून टाकलेले आहेत. त्यामुळे भाजपला अपेक्षित कामगिरी एनडीए घटकपक्ष करताना दिसत नाहीत. स्वतंत्र पत्रकारिता करणारे युट्युबर्स, काही स्थानिक सोर्सेस व वैयक्तिक अभ्यास या त्रिसूत्रीच्या सहाय्याने निवडणूकीचा एक्झिट पोल मी खालीलप्रमाणे वर्तवत आहे. सदर पोल हा अंदाज असल्याने फक्त एक शक्यता आहे. प्रत्यक्षात निकाल यापेक्षाही विपरित असू शकतात.

ममता बॅनर्जी, नितीशकुमार, नवीन पटनायक ऐनवेळी इंडिया आघाडीसोबत जातील अशीही एक शक्यता दिल्लीच्या वर्तुळात इंडिया आघाडीच्या बैठकीनंतर चर्चिली जात आहे. याव्यतिरिक्त भाजपा सिंगल लार्जेस्ट पार्टी ठरल्याने राष्ट्रपती सर्व नैतिक संकेत पायदळी तुडवतील. कोश्यारीने जे राज्यपाल पदावर बसून केले तेच मुर्मू राष्ट्रपती पदावरुन करतील, याचीही शक्यता वर्तवली जात आहे.

त्यामुळे इंडिया आघाडीने निकालानंतर ४८ तासांत पंतप्रधान पदाच्या उमेदवारासह सत्ता स्थापनेचा दावा करणार असल्याचे जाहीर केले आहे. शिवाय काँग्रेस गोदी मेडीयाच्या एक्झिट पोल डिबेटमध्ये सहभागी होणार नाही ते यासाठीच!

**(साभार)**

लोकसंसद

### नालेसफाईचा खर्च यंदा मुंबईला वाचवेल?

पावसाळ्याचे वेध लागताच पालिका प्रशासनाकडून मुंबईतील मान्सूनपूर्व तयारीला वेग आला आहे. ऐन पावसाळ्यात मुंबईची तुंबई होऊ नये म्हणून सध्या मुंबईतल्या सर्वच नाल्यांमध्ये मोठमोठ्या अजस्त्र यंत्राच्या मदतीने गाळ उपशाचे काम सुरू आहे. मोठ्या प्रमाणात साठलेला कचरा, गाळ काढून नाले सफाई केली जात आहे. मात्र दरवर्षी एवढे करूनही प्रत्यक्ष पावसाळ्यात पाण्याचा निचरा न झाल्याने मुंबईत ठिकठिकाणी पाणी तुंबते व नागरिकांना प्रचंड हाल सोसावे लागतात. वास्तविक वर्षभर कचरा टाकून नाले तुंबवणाऱ्यांकडे दुर्लक्ष करायचे आणि पावसाळ्यापूर्वी काही कोटी रुपये खर्च करून त्या नाल्यांची सफाई करायची हा प्रशासनाचा नित्याचाच वार्षिक कार्यक्रम झाला आहे. पण यामधून कंत्राटदार मालामाल होण्याशिवाय काहीच निष्पन्न होत नाही. पाणी तुंबायचे ते तुंबतेच, करदात्यांचे कोट्यावधी रुपये पाण्यात जातात. प्रशासनाकडून यंदा नालेसफाईसाठी २५० कोटी खर्च करण्यात येत आहेत. दुसरीकडे हवामान खात्याकडून यंदा मुंबईत एकूण सरासरीच्या १०० टक्के पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. अशावेळी नालेसफाईसाठी खर्च करण्यात येणारे २५० कोटी रुपये ऐन पावसाळ्यात तुंबलेल्या पाण्यात वाहून जाणार नाहीत अशी करदात्या नागरिकांची अपेक्षा आहे.

**- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी**

मराठी साहित्यिक दिनविशेष

**४ जून**

**१८५४ :** लेखक, कवी गो.वा. कानिटकर यांचा जन्म पुण्यात १८५४ साली झाला. पुण्यात प्राथमिक तर माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षण मुंबईत झाले. बी.ए.एल.एल.बी.ची पदवी संपादन करणाऱ्या कानिटकरानी हायकोर्टात वकिली केली. त्यानंतर ते मुन्सफ झाले. त्यांच्या साहित्यिक कामगिरीत 'मनोरंजन' हे मासिक काढून नंतर त्यात निबंध चंद्रिकेचाही समावेश केला, शेक्सपिअरच्या 'हॅम्लेट, कोरिओलेनस व मर्चंट ऑफ व्हेनिस' या नाटकांची त्यांनी भाषांतरे केली. त्यापैकी वीरसेन अथवा विचित्रपुरूचा राजपूत्र हे शेक्सपिअरच्या 'हॅम्लेट' चे त्यांनी केलेले रुपांतरीत भाषांतर गाजले. नारायण पेशवे यांचा वध, अकबर, बादशहा, कृष्णकुमारी आणि संमोहलहरी ही त्यांची काव्यरचना प्रसिद्ध झाली. याशिवाय तत्कालीन मासिकांतून त्यांच्या कविता गाजल्या. तथापि त्यांचा 'कविकूजन' या काव्यसंग्रह मात्र त्यांच्या निधनानंतर प्रसिध्द झाला. मूर, शैली, तोरू दत्त आदींच्या कविता त्यांनी भाषांतरीत केल्या असून, त्यांची रचना त्या काळातील लोकप्रिय नाट्यगीतांच्या चालीवर केली आहे. याशिवाय त्यांनी रविंद्रनाथांच्या गीतांजलीचे गद्य भाषांतर केले. भट्ट मोक्ष मुल्लरकृत व्याख्याने, व स्त्रियांची परवशता ही त्यांची दोन भाषांतरे उल्लेखनीय आहेत. त्यांच्या काव्याच्या रचना स्वयंस्फूर्त नसल्याने त्यात उत्कटतेचा अभाव आहे. असे त्यांच्या टीकाकारांचे म्हणणे आहे. १९०६ साली पुणे येथे 'भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. युगातील या क्रियाशील साहित्यिकाचे ४ जून १९१८ रोजी निधन झाले. **१९१३:-** लेखक, स्वातंत्र्यसेनानी, केसरीचे सहाय्यक संपादक प्रा. डॉ. वामन नारायण कुबेर यांचा जन्म. ह्यांनी 'डॉ. आंबेडकरी : विचारमंथन' ह्या ग्रंथातून आंबेडकरांच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विचारांचा परामर्श घेतला आहे. **१९२०:-** ऐतिहासिक ग्रंथांचे अनुवादक आणि महाराष्ट्र सरकारच्या 'स्वातंत्र्यसैनिक चरित्रकोशा'च्या दुसऱ्या खंडाचे संपादक डॉ. भगवान गणेश कुंटे यांचा जन्म. 'औरंगजेबाच्या कुळकथा' व 'औरंगजेबाचा इतिहास' (दोन्ही यदुनाथ सरकारांच्या पुस्तकावरुन), 'पानिपतची मोहीम अथवा काशिराजाचा वृत्तांत' (काशिनाथ पंडितांच्या मूळ फारसी बखरीच्या फारसीवरुनच अनुवाद), 'अहमदनगरची निजामशाही' व 'बहामनी राज्याचा इतिहास' (दोन्ही बृऱ्हाने मशीरकृत मूळ फारशी) हे अनुवाद त्यांनी केले. **१९२६:-** लेखिका इंदुमती प्रभाकर देव यांचा जन्म. ह्यांनी 'बोनसाई' या जपानी बागकामाचा अभ्यास केला असून त्यावर विवकोशात लेखन केले आहे. तसेच आकाशवाणी व दूरदर्शनवर मुलासाठी नाटके सादर केली. ह्याशिवाय त्यांनी विपूल प्रमाणात बालसाहित्याची निर्मिती केली आहे. त्यामध्ये 'संत चोखोबाचे चरित्र', 'जादूच्या गोळ्या', 'प्राण्यांच्या गोष्टी', 'नाम्या शिंपी व शबर शिकारी', 'रशियन लोककथा', 'सोनेरी बदक', 'सांबर उंबराची गोष्ट इ. साहित्य संपदा. **१९३२:-** लेखक प्रा. डॉ. पद्माकर लक्ष्मीकांत जोशी. ह्यांच्या ग्रंथसंपदेत 'नागरिकशास्त्र आणि नागरी समस्या', 'भारताचा संवैधानिक इतिहास', 'भारतीय संविधान शास्त्र आणि राजकारण', 'राज्यशास्त्रातील काही मुलतत्त्वे', 'शासन शास्त्रातील काही मुलतत्त्वे' ह्या पाठ्यपुस्तकांसह 'नागपूर नगरसंस्था शताब्दी ग्रंथ' मधून नागपूर शहराचा १८६४ ते १९६४ पर्यंतच्या नागरी जीवनाचा आणि राजकारणाचा आढावा घेतला आहे. **१९४५:-** कवी नरेश शंकर महाजन यांचा जन्म. 'भलतंसलतं' हा हास्यकवितांचा तसेच आणि एक भावकवितांचा काव्यसंग्रह त्यांच्या नावावर आहे. तसेच 'घराघरातल्या गंमत गोष्टी' हे विनोदी ललित लेखनाचे पुस्तक प्रकाशनाच्या मार्गावर आहे. **१९४७:-** बौध्द धर्माचे जागतिक दर्जाचे पंडीत, पाली भाषेचे अभ्यासक, लेखक धर्मानंद दामोदर कोसंबी यांचे निधन. कोसंबी यांच्या व्यक्तिमत्वावर बौध्द तत्वज्ञान, मार्क्सवादी विचार आणि गांधी प्रणीत अहिंसा, सत्याग्रह आदी तत्त्वज्ञानाचा प्रभाव. 'बुध्द, धर्म आणि संघ' या ग्रंथातून त्यांची बुध्दीवादी व चिकित्सक संशोधकीय दृष्टीकोन दिसून येतो. 'बुद्धलीला सारसंग्रह' या त्रिखंडात्मक ग्रंथातून बुद्धाचे चरित्र आणि उपदेश यांचे विवेचन केले आहे. 'भगवान बुद्ध' या ग्रंथातून तत्कालिन सामाजिक, राजकीय व धार्मिक इतिहासावर प्रकाश टाकला तर 'बौद्ध संघाचा परिचय' हा विनयपिटक व त्रिपिटकातील कथांवर आधारित आहे. 'समाधिमार्ग' मधून बुद्धाच्या अष्टांगिक मार्गाचे विवेचन तर हिंदी, संस्कृती आणि अहिंसाफ या पंचखंडात्मक पुस्तकातून भारतीय संस्कृती तसेच गांधीवाद, बुद्धतत्वज्ञान यांचा समन्वय साधणारे नव्या मानवधर्माचे तत्व मांडले आहे. याशिवाय 'बोधिसत्व' हे नाटक व 'निवेदन' हे आत्मचरित्रात्मक लेखन त्यांचे प्रसिध्द झाले आहे. **१९४८:-** साहित्यिका उज्ज्वला वामन दिघे यांचा नन्म. ह्यांच्या साहित्य संपदेत 'दैवाचा खेळ', 'सदाफुली', 'सावली' हे कथासंग्रह सामाजिक विषयांवर बेतलेले आहेत. 'कारवीच्या रानात' हा काव्यसंग्रह, 'लावण्यपती' हा लावणीसंग्रह आणि 'नृत्यमोहिनी' ही कादंबरी तमाशाच्या जीवनावर तर 'इनामदाराचा वाडा' ही कादंबरी सामाजिक विषयावर बेतलेली आहे. याशिवाय त्यांचे आणखी काही कथासंग्रह प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. **१९५१:-** चरित्रकार, निबंधकार, संकलक बलभीम भगवंत केसकर यांचे निधन. राजा राममोहन रॉय यांच्या चरित्रासह प्रार्थना समाज मंदिरातील व्याख्याने व प्रवचने त्यांनी पाच खंडात प्रसिध्द केली. **१९८१:-** गीतकार, गायक, संगीतकार, अभिनेता संदीप शेट्टीबा भुरे यांचा जन्म. त्यांच्या प्रकाशित साहित्य संपदेत 'क्रांतिगीते' ही गीतमाला आणि 'आकांत' हा काव्यसंग्रह प्रसिध्द तसेच विविध मासिके, दैनिके यातून कथा, कविता, ललित लेखन प्रसिध्द.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

४ जून

१) श्री. प्रभाकर गोविंद पाटील
विद्यानगर, अलिबाग, ४-६-१९३८
२) श्री. अनंत पांडुरंग पालशेतकर
अलिबाग, ४-६-१९२९
३) रामचंद्र वामन पाटील
कुरूळ, अलिबाग, ४-६-१९५८
४) श्री. सुभाष नारायण म्हात्रे
थळ, अलिबाग, ४-६-१९५७

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**१. श्रीमती सुनंदा कुलकर्णी, अलिबाग**

# ग्रामस्थांची वाट बिकट

## संबंधित अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष

**। पाली । वार्ताहर ।**
**गेल्या काही महिन्यांपासून चालू असलेल्या भेरव आवंढे कामथेकरवाडी रस्त्याचे काम अद्याप अपूर्णच आहे. पाऊस डोक्यावर असताना रस्त्याचे काम मात्र धीम्यागतीने चालू आहे. त्यामुळे यंदा येथील ग्रामस्थांना चिखलातून प्रवास करावा लागणार असल्याचे चित्र दिसून येत आहे.**

भेरव-आवंढे-कामथेकरवाडीया रस्त्याच्या कामाला गेली काही महिन्यांपासून सुरुवात झाली असून काम सुरुवातीपासूनच संथ गतीने सुरू आहे. प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतून या रस्त्याला मान्यता मिळाली असून सिद्धी विनायक कंस्ट्रक्शन कंपनीचे पोटठेकेदार आर.डी. कंस्ट्रक्शन कंपनीने काम हाती घेतले आहे. सद्यस्थितीत रस्त्यावर फक्त बीबीएम झाले असून खडी अंथरूण त्यावर मातीचा भराव करुन दबाई करण्यात आली आहे. तसेच, पाण्याचा निचरा होण्यासाठी टाकण्यात आलेल्या मोऱ्यांची कामे देखील नुकतीच पूर्ण झाली आहेत.



**प्रवास खडतर**

**येथील नागरिक मोठ्या प्रमाणावर बाहेरगावी जात असतात. विद्यार्थ्यांसाठी मानवविकास बसच्या काही फेऱ्या शाळेच्या वेळेत असतात. परंतु, आता खराब रस्त्यामुळे किंबहुना रस्ताच नसल्याने बस देखील बंद करण्यात येईल. त्यामुळे आता येथील विद्यार्थी, वृद्ध, आजारी व्यक्ती आणि प्रवासी यांचा प्रवास हा येणाऱ्या पावसात अतिशय खडतर बनणार हे मात्र निश्चित आहे.**

**आम्हाला प्रवासासाठी हा एकमेव मार्ग आहे. रस्त्याचे काम पावसापूर्वी झाले नाही तर पावसाळ्यात चिखलातून प्रवास करावा लागेल. आवंढे वरून पेडलीत जाण्यासाठी मधला रस्ता आहे. मात्र, पावसाळ्यात त्यावरून पुराचे पाणी वारंवार जात असल्याने भेरव मार्गेच जावे लागते. रस्त्याचे काम अतिशय धीम्यागतीने व निकृष्ठ पद्धतीने चालू असून संबंधित अधिकाऱ्यांना वारंवार सांगून देखील दुर्लक्ष केले जाते.**
**–नरेश देशमुख, स्थानिक आवंढे.**

**मशिरीच्या बिघाडामुळे काम रखडले होते. खडीकरणाचे काम आज चालू होत आहे. परंतु, पावसाळ्याआधी प्रवाशांना रहदारीयोग्य व्यवस्था केली जाईल.**
**– चंदन मोरे, कनिष्ठ अभियंता.**

भेरव ते कामथेकरवाडी हे ४ किमीचे अंतर असून काहीच दिवसांवर ठेपलेल्या पावसापूर्वी रस्त्याचे काम एवढ्या कमी अवधीत कसे पूर्ण होईल, असा प्रश्न येथील नागरीकांना पडला आहे.



# चिखली हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन

**। अलिबाग । वार्ताहर ।**
राज्यस्तरावर खो-खो खेळासाठी प्रसिद्ध असलेल्या सरखेल कान्होजी आंग्रे हायस्कूल चिखलीचे दुसरे स्नेहसंमेलन पोयनाडच्या अशोका लॉन या सभागृहात संपन्न झाले. १९८४ साली दहावीत शिकत असलेले हे विद्यार्थी सर्वगुणसंपन्न होण्यास, शाळेची कडक शिस्त, मराठी माध्यमातील उत्तम अध्यापन, भव्य प्रयोगशाळा, तनमनधन अर्पून विद्यार्थी हितासाठी झटणारे तत्कालीन शिक्षक या सर्व जमेच्या बाजूंनी महत्त्वाची भूमिका पार पाडली.

स्नेहसंमेलनात शाब्दिक स्वागतानंतर रोहिदास पाटील, चंद्रशेखर पाटील, मराठी माध्यमाची गोडी वाढविण्यासाठी झटणाऱ्या सुप्रिया पाटील, सुगंधा पाटील, गिरीधर कुथे आणि रमेश पाटील या सत्कार करण्यात आला. यावेळी षण्मुख पिंगळे, कमलाकर पाटील, महादेव धुमाळ, सुरेश वावेकर, विकास म्हात्रे, नितीन म्हात्रे, प्रभाकर कोठेकर, महेश वावेकर, दत्तराज पिंगळे, संदीप सुतार, विवेक पाटील यांच्यासह चाळीसहून अधिक विद्यार्थी उपस्थित होते.

## एटीएममध्ये पैसे नसल्याने नागरिक त्रस्त

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**
मुरुड शहरातील बाजारपेठेत बँक ऑफ इंडियाचे एटीएम असुन त्या एटीएममध्ये पैसे नसल्याने ग्राहकांनी नाराजी दर्शवली आहे.

लोकांना छोट्या मोठ्या कारणांसाठी दैनंदिन गरजा भागविण्यासाठी रोज पैसे लागतात. तसेच, व्यापाऱ्यांना व्यापारासाठी पैशाची कमतरता भासत असते. शहरात बँक ऑफ इंडिया व भारतीय स्टेट बँकचे दोन राष्ट्रीयकृत एटीएम आहेत. परंतु, बँक ऑफ इंडिया एटीएममध्ये नो कॅश तर स्टेट बँकेत नो नेटवर्कचे बोर्ड असल्याकारणाने ही दोन्ही एटीएम सध्या शोभेच्या वस्तू बनल्या आहेत. तर, दुसरीकडे खासगी बँकांच्या एटीएममधुन काही प्रमाणावर रक्कम ग्राहकांना मिळत आहे. पण राष्ट्रीयकृत बँकेच्या एटीएममधुन रक्कम का मिळत नाही, असा सवाल सर्व सामान्यांकडून होत आहे. गेले चार दिवस हेच चित्र असून ग्राहकांना अनेक अडचणीला सामोरे जावे लागत आहे.



# साराचे डॉक्टर होण्याचे स्वप्न

**। माणगाव । प्रतिनिधी ।**
माणगाव येथील हॉटेल व्यावसायिक शिवचरण चौधरी यांची नात व अमर चौधरी यांची कन्या सारा चौधरी हिने बारावी परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाल्यानंतर एम.बी.बी.एस. डॉक्टर होण्याची ईच्छा कृषीवल प्रतिनिधीजवळ बोलताना व्यक्त केली.

सारा चौधरी हि लहानपणापासूनच बुद्धीने अत्यंत तल्लक असून तिला वाचन, लेखन व वेगळं काहीतरी करण्याची आवड आहे. तिने माणगाव येथील एस.एस.निकम इंग्लिश स्कुलमध्ये शिकत असताना दहावी शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ९१% इतके गुण संपादन केले होते. त्यानंतर साराने आपले पुढील अकरावी ते बारावी शिक्षण माणगाव येथील अशोकदादा साबळे विद्यालय जुनिअर कॉलेज येथे विज्ञान शाखेतून घेतले. या ठिकाणी साराने फेब्रुवारी-मार्च २०२४ मध्ये झालेल्या बारावी प्रमाणपत्र परीक्षेत विज्ञान शाखेतून ८७.८३ % इतके गुण संपादन केले.

बारावी प्रमाणपत्र परीक्षेत तिने प्राप्त केलेल्या उज्वल यशाबद्दल तिचे नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, सरपंच सखाराम जाधव, सलीम शेख, दीपराज चौधरी यांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## आश्रम शाळेचा निकाल १०० टक्के

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**
कुलाबा आदिवासी सेवा मंडळ पालीचे अनुदानित आदिवासी प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा पडसरे येथील इयत्ता दहावीचा निकाल १०० टक्के लागला आहे. यावेळी दुर्गादास शिंगवा ७१.६० टक्के गुण मिळवून पहिला आला आहे. या उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थी तसेच, त्यांना अध्यापन करणारे शिक्षक यांचे कुलाबा जिल्हा आदिवासी सेवा मंडळाचे अध्यक्ष रवींद्र लिमये यांनी अभिनंदन करून विशेष कौतुक केले आहे.

# सरसगडावरील 'टाक' पुनरुज्जीवित

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**
दुर्गवेध युवा मराठा फाऊंडेशनच्या किल्ले सरसगड संवर्धन सुवर्ण महोत्सवी मोहीमेनिमित्त सुधागड येथील किल्ले सरसगडावरील पाली दरवाजाकडील नैऋत्य दिशेला असलेल्या बुरुजावरील पाण्याचे टाकं साफ करण्यासाठी सर्व दुर्ग संवर्धन संस्थांना आमंत्रित करण्यात आले होते.



मोहीम क्रमांक ५० आणि ५१ या मोहिमांमध्ये बा रायगड परिवार, स्वराज्यसेवक प्रतिष्ठान मावळा प्रतिष्ठान, शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, टीम दातेगड, टीम कोहोज, दुर्गवीर प्रतिष्ठान, दूर्गरत्न प्रतिष्ठान, स्वराज्याचे वैभव, गडकरी प्रतिष्ठान अशा अनेक संस्थांनी पुढाकार घेतला. तसेच, दोन दिवसांत तब्बल तीन टन गाळ व दगड टाक्यातुन बाहेर काढण्यात आला असून हे पाण्याचे टाकं पुनरुज्जीवित करण्यात आले. यावेळी संस्थेचे संस्थापक नितेश देसाई यांनी सहभागी सर्व संस्थांचे आभार मानले व सरसगडला सरस करायला इथून पुढेही हातभार लावण्यासाठी आवाहन केले.

# पनवेल येथे रक्तदान शिबीर संपन्न

**। पनवेल । वार्ताहर ।**
पनवेल येथील ऑरायन मॉल येथे रक्तदान शिबीर भरवण्यात आले होते. पनवेल परीसरातील नागरीकांनी दिलेल्या भरपुर प्रतिसादामुळे १६६ बाटल्यांचे रक्त संकलन झाले आहे. पनवेलकरांनी दिलेल्या प्रतिसादाबद्दल मंडळाचे अध्यक्ष व ओरायन मॉलचे मालक मंगेश परुळेकर यांनी पनवेलकरांना धन्यवाद दिले आहेत.




या शिबिराला माजी महानगरपालिका विरोधी नेते प्रितम म्हात्रे यांनी भेट देऊन स्वःता रक्तदाना केले. यामुळे मंडळाच्या कार्यकर्त्यांचा उत्साह वाढला. त्यांनी सांगीतले की, सध्या रक्ताचा तुटवडा जाणवत आहे. अशात तुम्ही शिबीर भरवून खरेच समाजऊपयोगी कार्य करत आहात, असे ते म्हणाले.

कुडाळदेशकर आद्य गौड ब्राह्मण समाज पनवेल यांचे अध्यक्ष मंगेश परुळेकर, नंदा नाईक, यतीन ठाकुर, विनायक तिरोडकर, शाम वालावलकर, हरीश परुळेकर, चंद्रकांत तेंदुलकर, भाऊ सामंत, अपूर्वा प्रभू, भारती खानोलकर, क्रांति ठाकुर, नीशा वालावलकर राजश्री देसाई, चेतना वालावलकर, सुनेत्रा गव्हाणकर, चिन्मय नाईक, गौरांग नाईक, सृष्टि नाईक यांनी अथक परीश्रम घेतले.

# मुरूड शहरातील इमारती धोकादायक

## नगरपरिषदेने दिल्या नोटीस

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**
पावसाळा जवळ आल्यामुळे मुरुड-जंजिरा नगरपरिषदेच्यावतीने जीर्ण, मोडकळीस आलेल्या आणि धोकादायक इमारतींची तपासणी करण्यात आली. या केलेल्या सर्वेक्षणात २२ इमारती धोकादायक असल्याचे निदर्शनास आले आसुन या सर्व इमारती मधील रहिवाशांना महाराष्ट्र नगर परिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियमच्या अन्वये या नोटीस बजावण्यात आल्या आहेत. यानुसार इमारती मधील रहिवाशांना तातडीने सुरक्षित स्थळी स्थलांतरित होण्याचे निर्देश नगरपरिषदेच्यावतीने देण्यात आले आहे.



यावेळी मुरूड-जंजिरा नगरपरिषद हद्दीतील सर्व मिळकतधारक व रहिवासी यांना आवाहन करण्यात आले की, पावासाळा सुरू होत आहे. या पावसाळी मोसमामध्ये संभाव्य अतिवृष्टी, पुर, वादळ तसेच जमिन खचणे, भुस्खलन, दरडकोसळणे, धोकादायक झाडे इत्यादी नैसर्गिक आपत्तींमुळे होणारी जिवीत व वित्तहानी टाळण्यासाठी ज्या मिळकती-इमारती धोकादायक झाल्या आहेत अशा इमारती अथवा मिळकती मध्ये कोणी ही वास्तव्य करुन नये. तसेच, शेजारच्या रहिवाश्यांची संभाव्य जिवित व वित्तहानी होऊ नये या दृष्टीने धोकादायक इमारती-मिळकतींचा धोकादायक भाग तातडीने उतरून घेऊन धोका नष्ट करावा. धोकादायक घराजवळील धोकादायक झाडांचा योग्यतो बंदोबस्त करुन सहकार्य करावे, असे आवाहन मुरुड जंजिरा नगरपरिषदेच्यावतीने प्रशासक तथा मुख्याधिकारी पंकज भुसे यांनी केले आहे.

## महाराष्ट्र प्रदेश कार्यालयाचे उद्घाटन

**। उरण । वार्ताहर ।**
केंद्रिय लोकशाही पत्रकार संघ राष्ट्रीय स्तरावर पत्रकारांसाठी काम करणारी संघटना आहे. राजू दळवी संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष असून राष्ट्रिय सरचिटणीस म्हणून गोविंद मोरे काम करत आहेत. महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष डॉ.मुनीर तांबोळी यांनी पनवेलमध्ये प्रदेश कार्यालय सुरू केले असून सोमवारी (दि.३) त्याचे उद्घाटन करण्यात आले.

# पहिल्याच पावसात पनवेल तुंबले

**। पनवेल । वार्ताहर ।**
सोमवारी सकाळपासून पावसाने पनवेल परिसरात पडण्यास सुरूवात केली होती. या पावसामुळे शहरातील अनेक सखल भागात पाणी तुंबण्याचे प्रकार घडले. यामुळे दहा मिनिटाच्या पडलेल्या पावसामुळे पनवेल महानगर पालिकेची नाले सफाईची पोलखोल उघडकीस आली.

मोठ्या प्रमाणात कोसळलेल्या पावसामुळे काही ठिकाणचा विद्युत पुरवठा खंडीत करण्यात आला होता. अनेक ठिकाणी पालिकेकडून समाधानकारक अशी नाले सफाई झाली नसल्यामुळे शहरातील अनेक भागात पाणी साठण्याचे प्रकार घडले. परंतु, या पावसाचा आनंद आबालवृद्धांसह बच्चे कंपनीने पावसात भिजून घेतला. तर अनेकांची या पावसामुळे चांगलीच धावपळ झाली. परंतु, उन्हाच्या काहिलीमध्ये अचानक सुरू झालेल्या पावसामुळे पनवेलकरांनी त्याचे स्वागत आनंदाने केले.



# बीज चांगले तर फळही चांगले: प्रकाश थिटे

**। खांब । वार्ताहर ।**
बीज चांगले असेल तर फळही चांगले येते अशाप्रकारचे विचार मा. सरपंच प्रकाश थिटे यांनी रोहा तालुक्यातील वैजनाथ या गावी व्यक्त केले. वैजनाथ या गावचे पाटबंधारे विभागातील सेवानिवृत्त अधिकारी मारूती सावरकर यांच्या ७० व्या अभिष्टचिंतन सोहळ्याप्रसंगी आयोजित करण्यात कार्यक्रमांतर्गत आपले मनोगत व्यक्त करताना ते बोलत होते.



यावेळी मा.सरपंच मनोज शिर्के, नरेश पाटील, संतोष दळवी, गणेश महाडिक, संदीप बाईत, दत्ता वातेरे, सुरेखा पार्टे ज्योत्स्ना मुंढे, सचिन मुंढे, राजेंद्र खरिवले, मनोज सावरकर, समिधा सावरकर, विनोद सावरकर, वैष्णवी सावरकर, मारूती रटाटे, अनिता रटाटे, तुकाराम बाईत, गणपत मोंडे आदी प्रमुख मान्यवरांसह सावरकर परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## इंदुबाई गावंड यांचे निधन

**। उरण । वार्ताहर ।**
उरण तालुक्यातील आव रे गावातील इंदुबाई रामदास गावंड यांचे रविवारी (दि.२) वयाच्या ८५ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात ९ मुले, ९ सुना, २४ नातवंड, २० पतवंड, नात सुना, नात जावई असा मोठा परिवार आहे. इंदुबाई यांचे दशक्रिया विधी मंगळवारी (दि.११) श्री क्षेत्र नाशिक येथे होणार आहे. उत्तर कार्य विधी शुक्रवारी (दि.१४) राहत्या घरी आवरे येथे होणार आहेत.

# सुवर्णा जाधव पुरस्काराने सन्मानित

**। माणगाव । प्रतिनिधी ।**
दर्पणकर बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघ व कृतिका महिला बहूउद्देशीय संस्था नाशिक यांच्या तर्फे माणगाव येथील सुवर्णा रुपेश जाधव यांना जागतिक महिलादीना निमित्ताने 'वुमन स्टार रायझिंग अवॉर्ड २०२४' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार सुवर्णा जाधव यांना त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून माणगाव एकतानगर येथील त्यांच्या निवासस्थानी रविवारी (दि.२) नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.



यावेळी शंकर शिंदे, अरुण क्षीरसागर, शर्मिला सत्वे, विवेक ढेपे, उमेश यादव, राहुल दसवते, शबनम पठाण, कुलसुम नायक, रुकसार खान, शमीम खान, रीना कनोजा, कौसर शेख आदी मान्यवरांसह एकता नगरातील ग्रामस्थ, महिला मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

# उरण तालुक्याची बत्ती गुल

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**
**उरण तालुक्यातील ३४ गावातील बत्ती गुल झाल्यामुळे रविवारच्या रात्री येथील नागरिकांना उकाड्याच्या आणि मच्छरच्या त्रासाला सामोरे जावे लागले. रात्री विद्युत पुरवठा खंडित झाल्यामुळे येथील नागरिकांची उकाड्यामुळे झोपच उडाली. त्यात मच्छरचा व अंधाराचा देखील त्यांना कमालीचा त्रास सहन करावा लागला. त्यामुळे येथील नागरिकांनी महावितरण कंपनीच्या ढिसाळ कारभाराबद्दल संताप व्यक्त केला आहे. भेंडखळ सोनारी येथे विद्युत केबल मध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे वीज पुरवठा खंडित झाल्याची माहिती समोर आली आहे.**



## उकाड्याने नागरिक हैराण

अव्वाच्या सव्वा येणाऱ्या वीज बिलांमुळे येथील नागरिक आधीच हैराण झाले आहेत. त्यात हा विजेचा तासंनतास लपंडाव सुरूच आहे. लहान मुले, वयोवृद्ध नागरिक, आजारी माणसे तर रात्री अक्षरशः हैराण झाली होती. रात्री अकरा वाजता खंडित झालेली वीज पहाटे चार वाजण्याच्या सुमारास आली असल्याचे नागरिकांकडून समजते. त्यामुळे नागरिकांना अख्खी रात्र जागून काढावी लागली. घरातील वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे उकाड्याने आणि मच्छरने त्रासून गेलेली माणसे रात्री झोप लागत नसल्यामुळे, घरासमोरील अंगणात येऊन त्यांनी बसण्याचे पसंत केले. वारंवार आणि तासंनतास खंडित होणारा वीज पुरवठा हल्ली एकही दिवस सलग सुरू असलेला वीज पुरवठा येथील नागरिकांनी पाहिला नाही. दिवसा व रात्रीचाही कितीतरी तास वीज पुरवठा नसतोच. विद्युत पुरवठा वारंवार खंडित होत असल्यामुळे विजेवर चालणारी सर्वच उपकरणे बंद पडून सर्व कामे वीजपुरवठा अभावी ठप्प होत असल्यामुळे मोठी गैरसोय होत आहे.

दरम्यान, मागील चार महिन्यांपासून भेंडखळ येथील खाडीजवळील विद्युत पोलांचे प्रलंबीत काम, गावोगावी पावसाळ्यापूर्वी विद्युत वाहक तारांना अडचण ठरणाऱ्या झाडांच्या फांद्या छाटने, ट्रान्सफार्म्यांवरील अतिरिक्त लोड कमी करण्यासाठी दुसरीकडे जोडणे यासह विविध विजेबाबत नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या मार्गी लावण्यासाठी महत्वपूर्ण बैठक घेण्यात आली.

सोनारी, करळ येथील एसइझेड प्रकल्पाच्या कामामुळे केबल तुटल्याची घटना घडली. तसेच, भेंडखळ येथे ही केबलमध्ये तांत्रिक बिघाड झाला असल्याने रविवारी रात्रीच्या सुमारास विद्युत पुरवठा खंडित झाल्याची घटना घडली होती. मात्र, महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी अंधारात विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रयत्न केले आहे. तरी रहिवाशांनी महावितरण कंपनीला सहकार्य करावे.
- विजय सोनावणे, उपअभियंता महावितरण कंपनी, उरण

निवडक

## आरोग्य शिबीर संपन्न

**रसायनी :** गणपती मंदिर,मोहोपाडा येथे रसायनी ब्राह्मण संघातर्फे डॉ.विलास कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य शिबीर पार पडले. यामध्ये स्तन कर्करोग, मुख कर्करोग आदी तपासण्या करण्यात आल्या. यावेळी ४४ रूग्णांना तपासले गेले आहे. यासाठी डॉ.प्रिया येडेकर, डॉ.पायल मते, डॉ.सानिका कुलकर्णी, डॉ.अनुजा महाजन यांचे सहकार्य लाभले. यावेळी रसायनी ब्राह्मण संघाचे अध्यक्ष बी. एस. कुलकर्णी, धनंजय जोशी आदी सदस्य उपस्थित होते.

## कारची वीज खांबाला धडक

**महाड :** महाड शहरातील एका व्यापाऱ्याच्या मुलाने अतिवेगाने कार चालवत रस्त्याकडेला असलेल्या एका विजेच्या खांबाला जोरदार धडक दिली. ही धडक जर विजेच्या खांबाला दिली नसती तर रस्त्यावरील नागरिकांचे नाहक बळी गेले असते. हा मुलगा १७ वर्षाचा अल्पवयीन आहे. तो अल्पवयीन असल्याने त्याचे वडील सुरेश गंगाजी परमार यांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. याप्रकरणी अधिक तपास महाड शहर पोलीस करत आहेत.

## पुलाखाली आढळला मृतदेह

**पनवेल :** पनवेल एसटी स्टँण्ड समोरील उड्डाणपुलाखाली एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.सदर इसमाचे अंदाजे वय ४० ते ४५ वर्षे, डोक्याचे केस पांढरे व दाढी मिशी वाढलेली पांढरी, बांधा सडपातळ, मानेवर पांढऱ्या रंगाचा चट्टा आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक उद्धव सोळंके यांच्याशी संपर्क साधावा.

## गाडीची रिक्षास धडक

**पनवेल :** भरधाव गाडीने एका रिक्षास धडक दिल्याने झालेल्या अपघातात रिक्षा चालकासह प्रवाशी जखमी झाल्याची घटना तालुक्यातील कोन गाव हद्दीत घडली आहे.नेताजी विश्वकर्मा हा त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने घेवून पनवेल जवळील कोन ते रसायनी रस्त्यावरील होंडा कंपनीसमोर कोन गाव येथून चालला असताना त्याने रिक्षाला धडक दिल्याने झालेल्या अपघातात रिक्षा चालक महेंद्र माळी याच्यासह रिक्षातील प्रवाशी हे किरकोळ जखमी झाले.

## नवी मुंबई पोलिसांचे आवाहन

**पनवेल :** लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आदर्श आचारसंहिता अंमलात असून रायगड व मावळ जिल्ह्यासह संपूर्ण देशभरात लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीचा निकाल मंगळवारी (दि.४)जाहीर होणार आहे.कोणीही नागरिक सदर निवडणूक निकाल दरम्यान व निकाल जाहीर झाल्यानंतर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करू नये अन्यथा कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी, असे आवाहन नवी मुंबई पोलिसांनी केले आहे.

# पाझर तलावांनी गाठला तळ

## कर्जतमधील दहा तलाव कोरडे; पिण्याच्या पाण्याची समस्या वाढली

**। नेरळ । वार्ताहर ।**

**कर्जत तालुक्यात पाणी जमिनीत मुरावे आणि पाण्याची भूजल क्षमता वाढावी यासाठी पाझर तलाव बांधण्यात आले आहेत. तालुक्यात १९७८ ते १९८५ या काळात बांधण्यात आलेल्या सर्व दहा पाझर तलावांमधील पाण्याने तळ गाठले आहे. तालुक्यातील पाणी टंचाई वाढली असून शासनाचे टँकर वाडी वस्त्यांवर जाऊन पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करीत आहेत. दरम्यान,कर्जत तालुक्याची पाण्याची तहान भागविण्यासाठी शासनाने कामतपाडा, ओलमन, देवपाडा, वारे येथील साईटवर पाझर तलावांची उभारणी करावी अशी मागणी पुढे येत आहे.**



कर्जत तालुक्यात रायगड जिल्हा परिषदेचे लघुपाटबंधारे विभागाचे वतीने पाण्याची क्षमता वाढविण्यासाठी पाझर तलावांची निर्मिती करण्यास सुरुवात झाली. त्यानंतर १९७८ पासून ११९५ पर्यंत दहा ठिकाणी पाझर तलावांची निर्मिती झाली.त्यानंतर शासन कडून म ागील ३० वर्षात एकही नवीन पाझर तलाव बांधला नाही. त्यात नऊ तलावांपैकी दोन तलावांची दुरुस्ती यापूर्वी झाली होती आणि आता आणखी दोन तलावांची दुरुस्ती सुरु आहे. त्यामुळे अनेक वर्षे दुरुस्ती न झाल्याने कर्जत तालुक्यातील पाझर तलाव हे गाळाने भरले आहेत.

त्यामुळे तेथील पाण्याची साठवण क्षमता देखील कमी झाली आहे. डोंगरपाडा पाझर तलाव फुटला होता तर खांडस, आर्डे आणि कशेळे येथील पाझर तलाव मातीने भरले असल्याने त्यांची पाणी साठवण क्षमता कमी झाली आहे. यावर्षी तालुक्यातील गावंडवाडी आणि अंभेरपाडा येथील पाझर तलावांची दुरुस्ती कामे सुरु असल्याने सध्या त्या पाझर तलावात पाणी आता शून्यावर गेला आहे.

**पाझर तलावातील पाण्याची स्थिती (द.ल.घ.मी.)**

| तलाव | एकूण क्षमता | सध्याची स्थिती |
|---|---|---|
| खांडपे | ६४२ | १२८ |
| बलीवरे | ३५१ | ७० |
| कशेळे | १८७ | ४० |
| वरई | ६७१ | १२० |
| अंभेरपाडा | ४० | ०० |
| खांडस | १८४ | ४० |
| डोंगरपाडा | ३६८ | ७० |
| जामरुंग | ४५० | ७० |
| गावंडवाडी | ५८० | १२० |
| आर्डे | ७५ | २० |

सध्या तालुक्यातील खंडापे येथील पाझर तलावामध्ये २० टक्के पाणी साथ आहे. तर बळीवारे, वरई, डोंगरपाडा येथील पाझर तलावांमध्ये जेमतेम १० टक्के पाणीसाठा आहे.आर्डे,खांडस आणि कशेळे येथील पाझर तलावात जेमतेम ५ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. त्यामुळे तालुक्यातील पिण्याच्या पाण्याची स्थिती गंभीर झाली आहे. या सर्व पाझर तलावातील पाणी पाझरून हे खालील भागात जाते. मात्र पाझर तलाव आटल्याने त्या पाण्यावर अवलंबून असलेल्या खालील भागातील नळपाणी योजना यांचा पाण्याचा पुरवठा बंद झाले आहे. त्यामुळे पाण्याच्या पाण्याची टंचाई वाढली.तालुक्यात १९९५ नंतर एकही पाझर तलावाची निर्मिती झाली नाही. त्यामुळे तालुक्यात कामतपाडा, वारे, देवपाडा, ओलमन, बेडीसगाव आदी ठिकाणी पाझर तलाव नव्याने बांधण्याची कार्यवाही व्हावी अशी मागणी होत आहे.

## डीएल.एड. अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया जाहीर

**। रायगड । प्रतिनिधी ।**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने प्राथमिक शिक्षण पदविका प्रथम वर्ष प्रवेशाचे वेळापत्रक प्रसिद्ध केले आहे. त्यानुसार येत्या सोमवारपासून (दि.३) ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू होणार असून, पहिल्या फेरीचे प्रवेश २७ जूनपासून सुरू केले जाणार आहेत.

एससीईआरटीकडून डी. एल.एड. अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येते. बारावीच्या निकालानंतर विद्यार्थ्यांची विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी लगबग सुरू होते. त्यात काही विद्यार्थी बारावीनंतर डी.एल.एड अभ्यासक्रमाला प्रवेश घेतात. यंदा विद्यार्थ्यांना ३ जून ते १८ जून या कालावधीत डी.एल.एड अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी अर्ज करता येणार आहे. जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्थेकडून अर्जाची पडताळणी ३ ते १९ जून या कालावधीत केली जाणार आहे. तर अंतिम गुणवत्ता यादी २६ जून रोजी प्रसिद्ध केली जाईल. पात्र विद्यार्थ्यांना २७ जून ते १ जुलै या कालावधीत प्रवेश घेता येईल. दुसऱ्या फेरीसाठी २ जुलैला विद्यार्थ्यांना महाविद्यालयांचे पर्याय भरता येणार असून पूर्वी भरलेले पर्याय बदलता येतील. ४ जुलैला प्रवेशाची दुसरी यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. दुसऱ्या फेरीतून प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना ४ ते ८ जुलै या कालावधीत प्रवेश घेता येणार आहे. प्रवेशाची तिसरी फेरी ११ जुलै रोजी सुरू होणार आहे. एससीईआरटीने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार शासकीय आणि व्यावसायिक कोट्यासाठी स्वतंत्र वेळापत्रक आहे.

विद्यार्थ्यांनी दिलेल्या वेळापत्रकानुसार प्रवेश प्रक्रियेत सहभागी होण्याचे आवाहन राज्यस्तरीय डी.एल.एड प्रवेश निवड, निर्णय आणि प्रवेश संनियंत्रण समितीचे अध्यक्ष राहुल रेखाराव यांनी केले आहे.

## ललिता पाटील यांचा सेवानिवृत्ती सोहळा

**। वाघ्रण । वार्ताहार ।**

ना.ना. पाटील हायस्कूलच्या सुलभाकाकू सभागृहात इंग्रजी पेझारी माध्यमिक विभागाच्या प्राचार्या ललिता किशोर पाटील यांचा निरोप समारंभ संपन्न झाला. को.ए.सो.ना. ना. संकुलाचे प्राचार्य शशिकांत पाटील यांचे अध्यक्षतेखाली सदर सेवापूर्तीचा कार्यक्रम पार पडला.

इंग्रजी माध्यमिक शाळेने सौभाग्याचे वस्त्र देऊन ओटी भरली. सर्व सेवकांनी घेतलेली भेट वस्तू देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. सदर प्रसंगी प्रदिर्घ सेवे बद्दल आणि मिळालेल्या सहकार्या बद्दल शिक्षिका प्रिया पाटील, तृप्ती पाटील, पूनम धुमाळ, राजश्री पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले.




सत्काराला उत्तर देताना ललिता पाटील यांनी संस्थेचे माजी अध्यक्ष संजय पाटील, विद्यमान अध्यक्ष ॲड. सिद्धार्थ पाटील आणि संस्थेतील सर्व पदाधिकारी याविषयी कृतज्ञता व्यक्त केली. ॲड. दत्ता पाटील यांनी दिलेल्या सेवेच्या संधी करीता विशेष कृतज्ञता व्यक्त केली. इंग्रजी माध्यमिक शाळेचे चेअरमन ॲड. आस्वाद पाटील आणि सर्व पाटील कुटुंबियानी केलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले.

## पाठ्यपुस्तकांची जबाबदारी गटशिक्षणाधिकाऱ्यांची

**। रायगड ।प्रतिनिधी ।**

शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना नवीन पाठ्यपुस्तके उपलब्ध करून देण्याचे आदेश जिल्हा पातळीवरून काढण्यात आले आहेत. यासाठी तालुका पातळीपर्यंत पाठ्यपुस्तके आल्यानंतर ते शाळा पातळीवर पोहचवण्याची कामगिरी प्रत्येक तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी यांच्यावर सोपवण्यात आलेली आहे. याबाबतचे आदेश शिक्षणाधिकारी यांनी जिल्हा पातळीवरून काढले आहेत.

दरवर्षी जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्या दिवशी पाठ्यपुस्तके उपलब्ध करून देण्यात येतात. यासाठी पूर्वी पुण्यातील बालभारतीकडून जिल्हा पातळीवर, त्यानंतर तालुका आणि तालुका पातळीवरून केंद्र शाळा पातळीवर पाठ्यपुस्तके उपलब्ध करून देण्यात येतात. केंद्र पातळीवरून संबंधित शाळेच्या शिक्षकांना स्वत:च्या गाडीत अथवा स्वखर्चाने पाठ्यपुस्तके शाळा पातळीवर न्यावी लागत होती.



यंदा मात्र या प्रक्रियेत बदल करण्यात आला असून आता तालुका पातळीवर पाठ्यपुस्तके आल्यानंतर त्याठिकाणी गटविकास अधिकारी यांनी अधिकृतपणे तालुक्यातील प्रत्येक शाळेत पाठ्यपुस्तके पाठवण्यासाठी अधिकृतपणे वाहतुकीचे टेंडर काढून ती पाठ्यपुस्तके शाळा पातळीवर पाठवण्याचे आदेश जिल्हा पातळीवरून शिक्षणाधिकारी यांनी काढले आहेत. त्यानुसार शाळा स्तरावर पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तके पाठवण्याची जबाबदारी संबंधित तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी यांच्यावर सोपवण्यात आली आहे.

जिल्ह्यात मोफत पाठ्यपुस्तके योजनेत आतापर्यंत जवळपास सर्वच तालुक्यात शंभर टक्के पुस्तकांचा पुरवठा झाला असल्याचे शिक्षण विभागातून सांगण्यात आले. काही तालुक्यातील पाठपुस्तके पुरवठा करणाऱ्या शेवटच्या गाड्या प्रवासात असून त्या आज- उद्या तालुका पातळीपर्यंत पोहचणार असल्याचे शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले.

## दोन गावांना पाणी साठवण टाक्या

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या कॅरींग फ्रेंडस् या संस्थेकडून माथेरान डोंगरातील दोन आदिवासी वाड्यांना पाणी साठवण टाकी भेट देण्यात आली. यापूर्वी या संस्थेने चार आदिवासी वाड्यांमध्ये पाण्याचे साठवण करण्यासाठी पाण्याच्या टाक्या भेट दिल्या होत्या.



माथेरानमधील व्यवसायिक नितीन शहा यांच्या माध्यमातून प्रामुख्याने माथेरानचे पायथ्याशी असलेल्या आदिवासी वाड्यांमध्ये सामाजिक कार्य विविध संस्थांचे माध्यमातून सुरू असते.त्यातील कॅरींग फ्रेंडस् या संस्थेने जानेवारी महिन्यात आसलवाडी, धनगर वाडा, नाण्याचा माळ, खोंडा या ठिकाणी पिण्याच्या पाणी साठवून ठेवण्यासाठी टाक्या भेट देण्यात आल्या होत्या. त्यानंतर आदिवासी लोकांची मागणी लक्षात घेवून माथेरान डोंगरात असलेल्या धोधाणी या गावासाठी तसेच वाघाची वाडी या आदिवासी वाडीसाठी साठवण टाकी भेट देण्यात आली. पाच हजार लिटर क्षमता असलेल्या या टाक्या गावापर्यंत पोहचवून देण्याचे कार्य या संस्थेच्या माध्यमातून करण्यात आले.

## नेट परीक्षा १८ जूनला

**रायगड :** सहायक प्राध्यापक पदासाठी आणि पीएच.डी. प्रवेशासाठी अनिवार्य असलेल्या विद्यापीठ अनुदान आयोग राष्ट्रीय पात्रता परीक्षेचे वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आले. त्यानुसार ही परीक्षा येत्या १८ जूनला घेतली जाणार आहे. आतापर्यंत पीएचडी प्रवेशासाठीची परीक्षा विद्यापीठ स्तरावर घेतली जात होती. युजीसीने पीएचडी प्रवेशासाठी नेट परीक्षा ग्राह्य धरण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे यंदा प्रथमच नेट परीक्षेच्या गुणांच्या आधारे देशभरातील विद्यापीठांमधील पीएच.डी. पदवीसाठी प्रवेश देण्यात येणार आहे. त्यानुसार राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणाकडून नेट परीक्षा सकाळी साडेनऊ ते दुपारी साडेबारा, दुपारी तीन ते सायंकाळी सहा अशा दोन सत्रात होणार आहे. एनटीएने परीक्षेच्या तारखेसह परीक्षा शहर पत्रक प्रसिद्ध करण्याबाबतची माहिती जाहीर केली. अर्जदारांसाठी परीक्षा शहर पत्रक परीक्षेच्या दहा दिवस आधी म्हणजेच ८ जूनला उपलब्ध करून दिले जाणार आहे.

## दाखल्यांसाठी शासकीय कार्यालयात तारेवरची कसरत

**। रायगड । प्रतिनिधी ।**

महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. प्रवेश घेताना उत्पन्न दाखला आणि रहिवासी दाखल्याची गरज असल्याने विद्यार्थी तलाठी कार्यालयात धाव घेत आहेत. परंतु, तलाठी निवडणुकीच्या कामात अडकल्याने आणि ऑनलाईन प्रणालीत अनेक समस्या येत असल्यामुळे दाखले मिळण्यास विलंब होत आहे. त्यामुळे रायगड जिलह्यातील विद्यार्थी आणि पालकांना ऑनलाईन दाखले काढण्यासाठी सायबर चालकाकडे हेलपाटे मारावे लागत आहे. तेथेही सायबर चालक अव्वाच्या सव्वा पैसे आकारत असल्याने पालकांना आर्थिक फटका बसत आहे.

ही गैरसोय दूर करण्यासाठी तलाठी कार्यालयात शैक्षणिक दाखले वाटप शिबिराची आवश्यकता निर्माण झाली आहे. विद्यार्थी व पालक शासकीय दाखले काढताना दलालांच्या तावडीत सापडू नयेत, त्यांची फसवणूक होऊ नये. त्यांना चांगली सुविधा मिळावी, या उद्देशाने विविध शासकीय दाखले, प्रमाणपत्र ऑनलाईन करण्यात आले आहेत. या ऑनलाईन प्रणालीमुळे विविध दाखले तातडीने मिळतील, असे वाटत असतानाच आता हीच प्रणाली विद्यार्थी, पालकांसाठी डोकेदुखीची ठरत आहे. अर्ज केल्यानंतर दोन आठवड्यातही प्रमाणपत्र मिळत नसल्याने विद्यार्थी अडचणीत सापडत आहेत. सध्या शिष्यवृत्ती व शालेय प्रवेश मिळवण्यासाठी रहिवासी दाखला, उत्पन्न दाखल्याची गरज आहे. मात्र, सध्या तलाठी निवडणुकीच्या कामात गुंतल्याने हे दाखले वेळेत मिळत नाही. वारंवार हेलपाटे मारावे लागत असल्याने विद्यार्थी आणि पालक हैराण झाले आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीपासून वंचित राहावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. अनेकदा अर्जदाराला अर्जात त्रुटी असेल, तर बहुतांश वेळा माहितीच पाठवली जात नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचा वेळही वाया जात आहे. परिणामी, अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य धोक्यात येण्याची शक्यता आहे.दुसरीकडे तलाठी कार्यालयात कामे विलंबाने होत असल्याने अनेक जण सायबर चालकाकडे ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी जात आहे. ऑनलाईन दाखल्यासाठी अर्ज भरताना मात्र सायबरचालक अव्वाच्या सव्वा पैसे आकारत आहेत. अनेकदा वीज नसणे, सर्व्हर डाऊन, नेटवर्क नसणे असे कारण देत विद्यार्थी व पालकांना हेलपाटे मारायला लावत असल्याच्या तक्रारी पालक करत आहेत.

## धोकादायक सुरुचे झाड तोडण्याची मागणी

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरूड पर्यटन क्षेत्र असून या ठिकाणी पर्यटकांची ओघ वाढत आहे. या ठिकाणी पर्यटक व स्थानिक नागरिक समुद्रकिनारी ये-जा करित असतात. समुद्रकिनाऱ्यालगत असणाऱ्या सुरूचा झाड सुशोभिकरणाच्या खोदकामामुळे हे झाड कमकुवत होऊन पडलेल्या अवस्थेत दिसत असल्याने या झाडापासून नागरिकांना धोका निर्माण होऊ शकतो.

नगरपरिषदेने तात्काळ लक्ष देऊन हे झाड तोडून पर्यटकांना व नागरिकांना दिलासा द्यावा अशी मागणी पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाचे अध्यक्ष- अरविंद गायकर यांनी मुरूड जंजिरा नगरपरिषदेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

मुरूड जंजिरा नगरपरिषद मार्फत मुरूड समुद्रकिनाऱ्यावर सुशोभिकरणाचे काम जोरदार सुरू असल्याने समुद्रलगत असणाऱ्या मरीना हॉटेलसमोरील गटार



खोदकामामुळे सुरुचे झाड मुळातून कमजोर झालेले दिसून येत आहे. हे झाड भयानक परिस्थिती असून पहिल्या पावसात हे झाड पडुन सभोवती असणाऱ्या दुकानांचे स्टॉलचे आर्थिक नुकसान करु शकते. झाडालगत असणाऱ्या विद्युत तारा तुटून विद्युत पुरवठा खंडित होऊ शकतो. यामध्ये जीवितहानी सोण्याची शक्यता आहे. यासाठी नगरपरिषदेने झाड तोडून नागरिकांना व पर्यटकांना दिलासा द्यावा, अशी मागणी अरविंद गायकर यांनी केली आहे.

## छायाचित्रकार सुधीर नाझरे यांना सुवर्णपदक

**। मुरुड । वार्ताहर ।**

**भारतात मानाची समजली जाणारी मुंबई फोटोग्राफी सोसायटी ऑफ इंडियाच्या २२ व्या इंटरनॅशनल छायाचित्र स्पर्धेत जगभरातून ४८ देशांनी सहभाग घेतला ५४३१ हजारपेक्षा जास्त छायाचित्र परीक्षणासाठी आली त्यातील रायगडचे वृत्तपत्र छायाचित्रकार सुधीर नाझरे यांच्या आळंदीचे माऊली प्रस्थानाचे चित्र ट्रॅव्हल विभागात पी.एस.ए. गोल्ड मेडल बेस्ट स्टोरी व वृंदावन विडो होळीच्या फोटोला गोल्ड मेडल देऊन गौरवण्यात आले. यावेळी मुंबईचे फिल्ममेकर ज्येष्ठ कलाकार गंगाधर मेनन, अध्यक्ष आनंद निरगुडे, सचिव राजेंद्र वाघमारे, नितीन पवार, साशंक रणजित, समीर मोहिते, गणेश मेमाणे आदी नामांकित छायाचित्रकार उपस्थित होते.**

सुधीर नाझरे गेली २४ वर्ष वृत्तपत्र छायाचित्रकार म्हणून विविध वृत्तपत्रात काम करत आहेत.





महाराष्ट्रातील ४३ पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. त्यांचे महाराष्ट्रात १२ ठिकाणी छायाचित्रांचे प्रदर्शन झाले आहे. मागील ३ वर्ष जागतिक स्पर्धेत नाझरे यांनी भाग घेण्यास सुरूवात केली. आज त्यांच्या विविध चित्रांना १९८ गोल्ड मेडल प्राप्त झाले आहेत. फोटोग्राफी सोसायटी ऑफ अमेरिकाचे अनेक गोल्ड मेडल मिळवून महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा असलेले चित्र जगासमोर नेहमीच्या मांडत आले आहेत.

गंगाधर मेनन म्हणाले, छायाचित्रण स्पर्धेत ४८ देशाचे नामवंत छायाचित्रकार सहभागी झाले. प्रदर्शनातील विजेते फोटो अतिशय सुंदर आणि बोध देणारे आहेत.कलेचा वारसा जागतिक पातळीवर पुढे नेण्याचे काम मुंबईची फोटोग्राफी सोसायटी ऑफ इंडिया सातत्याने करत आहे. प्रदर्शनात ९ दिवस विविध नामवंत छायाचित्रकारांचे अभ्यासपूर्ण प्रशिक्षण ठेवण्यात आल्याने नवीन होतकरू छायाचित्रकारांना पर्वणीच आहे. ते सूचना करताना म्हणाले, स्पर्धेत ब्लॅक अँड व्हाईट व मोनोक्रोम हे दोन्ही वेगळे विषय असल्याने पुढील काळात विषय देताना दोन स्वतंत्र विषयाचे फोटो मागावा.

प्रदर्शनात विजेते ७६ फोटो लावण्यात आली आहेत.२६ छायाचित्रे परदेश छायाचित्रकारांची आहेत. तर ५० छायाचित्रे भारतीय आहेत. नितीन जैन, हुसना खोत, भास्कर आठवले, गणेश मेमाणे, यशोधन नवघरे, आमोद कुमार, रवींद्र कांबळी, अंकुर तांबे आदी नामवंत छायाचित्रकारांची चित्रे भारतीय विद्या भवन येथे लावण्यात आली आहेत.

# मावळमध्ये घाटाखाली लीड घेणारा बाजी मारणार

। उरण । वार्ताहर ।

मावळ लोकसभेची गेल्यावेळची (२०१९) निवडणूक ही एकतर्फी होऊन शिवसेनेचे श्रीरंग बारणे हे २ लाख १५ हजारांच्या लीडने निवडून आले होते. यावेळी मात्र मावळात अटीतटीची लढत झाली आहे, त्यामुळे महायुती (बारणे) आणि महाविकास आघाडीच्या (संजोग वाघेरे-पाटील) प्रमुख उमेदवारांनी लाखाच्या मताधिक्याचे दावे केले आहेत.

मतदानाच्या चौथ्या टप्यात १३ मे रोजी मावळमध्ये ५५ टक्के मतदान झाले. गतवेळपेक्षा ते ५ टक्याने कमी झाले आहे. त्यामुळे विजयी होण्याची शक्यता असलेल्या दोन्ही प्रमुख उमेदवारांनी केलेले लाखाच्या लीडचे दावे फोल ठरणार आहेत. मतदानानंतर आठ दिवसांनी (२१ मे) बारणेंनी पिंपरी-चिंचवडमधील थेरगाव येथील आपल्या निवासस्थानी घेतलेल्या पत्रकार परिषदेत अडीच लाखांपेक्षा जास्त मताधिक्याने विजयी होण्याचा दावा केला आहे. त्याअगोदर वाघेरेंनी विधानसभा मतदारसंघनिहाय झालेल्या मतदानाच्या आधारे आपण पावणेदोन लाखाच्या लीडने विजयी होऊ, असा दावा केला होता.

मावळमधील लढत ही यावेळी घासून झाली. ती गेल्या वेळेसारखी एकतर्फी झाली नाही, त्यामुळे तेथील विजयी होणारा उमेदवार हा यावेळी लाखाच्या आतील लीडनेच निवडून येणार आहे. यावेळी ही निवडणूक स्थानिक स्वराज्य संस्थेसारखी नात्यागोत्याची आणि गावकीभावकीची झाली आहे.

वाघेरे आणि बारणे दोघेही मराठा असल्याने मराठा आरक्षण आंदोलन आणि प्रश्नाचा अजिबात प्रभाव तेथे जाणवला नाही. उलट पुन्हा घाटावरच्या आणि पिंपरी-चिंचवडकर उमेदवारांमध्ये ही लढाई झाली. पर्यायाने पिंपरी, चिंचवड, मावळ या घाटावरील तीनही विधानसभा मतदारसंघात या दोघांनाही मतदान झाले. त्यामुळे घाटाखालील पनवेल, कर्जत आणि उरणमधून कोण किती लीड घेणार, यावरच घाटावरील या दोन्ही उमेदवारांचे भवितव्य अवलंबून असणार आहे.

# कोल्हारे-तळवडे रस्त्यावर इको कारला अपघात

## जीवितहानी नाही, वाहनाचे मोठे नुकसान

। नेरळ । वार्ताहर ।

कोल्हारे-तळवडे रस्त्यावर इको कारला रविवार रात्री अपघात झाला. या अपघातात कुठलीही जीवितहानी झालेली नसली तरी यात वाहनाचे मोठे नुकसान झाले आहे. वाहन चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने अपघात झाला असल्याचे बोलले जात आहे. तर नेरळ कोल्हारे पिंपळोली या भीमाशंकर राज्य मार्गावरील कोल्हारे तळवडे येथे सिमेंट काँक्रिट रस्त्याचे काम सुरू असून, हे काम ठेकेदार सोयीनुसार करीत असल्यानेदेखील अपघात घडत असल्याचा आरोप होत आहे. तालुक्यात अनेक ठिकाणी सिमेंट काँक्रिट रस्त्याची कामे अद्याप सुरू आहेत.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक




# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लॅटिंग दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटिक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे-बोरीस, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील क्षेत्राचे वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. चंद्रकांत अनंत पाटील, यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक/ उपविभाग | क्षेत्र (हे. आर) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| बोरीस ता. अलिबाग | ४१/६ | ०-४७-०० पो.ख.०-००-०० एकुण ०-४७-०० | ०२.१९ |

सदर मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

वर वर्णन केल्याप्रमाणे क्षेत्राची जमिन मिळकती ह्या त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहिवाटीतील असून, त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. तसेच सदरहू मिळकती मधून परंपरागत पावसाचे पाणी जाणेच मार्ग आहे, मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा तिचे कोणत्याही भागावार कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरीहक्क लिस पेंडन्स, वहिवाट, एफ.एस.आय, भू संपादन दावा, हक्कनोंद, अपील, साठेकरार, बायणापावती, कोर्ट वादंग. या अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत आल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखीस्वरूपात आणून द्यावीत, मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकती विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काच्या आहेत व त्यावर अन्य कुणाचा ही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०५/०६/२०२४

**ॲड. राहुल रमेश नाईक**
मु. नागांव, ता. अलिबाग
मोबा. क्र. ९९२२७९८५२८

पक्षकार यांचे मान्यतेची सही

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे-बोरीस, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील क्षेत्राचे वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. आदेश शेषनाथ पेके व श्री. केदारनाथ विठू पेके, यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक/ उपविभाग | क्षेत्र (हे. आर) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| बोरीस ता. अलिबाग | ३९/३ | ०-४९-२० पो.ख.०-००-०० एकुण ०-४९-२० | ०१.२५ |

सदर मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

वर वर्णन केल्याप्रमाणे क्षेत्राची जमिन मिळकती ह्या त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहिवाटीतील असून, त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. तसेच सदरहू मिळकती मधून परंपरागत पावसाचे पाणी जाणेच मार्ग आहे, मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा तिचे कोणत्याही भागावार कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरीहक्क लिस-पेंडन्स, वहिवाट, एफ.एस.आय, भू संपादन दावा, हक्कनोंद, अपील, साठेकरार, बायणापावती, कोर्ट वादंग. या अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत आल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखीस्वरूपात आणून द्यावीत, मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकती विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काच्या आहेत व त्यावर अन्य कुणाचा ही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०५/०६/२०२४

**ॲड. राहुल रमेश नाईक**
मु. नागांव, ता. अलिबाग
मोबा. क्र. ९९२२७९८५२८

पक्षकार यांचे मान्यतेची सही

## E –TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :- 7000031277** **Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-24/2024-2025.** RFx E-tender for for Providing ITI certified Operator and Technician in Electrician trade for various substation under EHV (O&M) Dn. Panvel from 01.07.2024 to 31.03.2025. **Tender amount Rs. 2,24,44,316/-,** **EMD amount Rs. 2,24,443/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **04.06.2024, 11:00 Hrs. to 11.06.2024, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 11.06.2024 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **12.06.2024 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड, गट नं. ३२४, एकूण क्षेत्र ०-४३-२० हे.आर., आकार ११.०५ रू. पै. ही मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक १) सुनिल रघुनाथ म्हात्रे २) कल्पना सुदाम म्हात्रे ३) रंजना अशोक म्हात्रे ४) गजानन शांताराम म्हात्रे ५) नवनाथ शांताराम म्हात्रे ६) साधना सतिष म्हात्रे ७) श्रुती सतिष म्हात्रे ८) स्वाती सतिष म्हात्रे ९) चैताली सतिष म्हात्रे १०) मिनाक्षी काशिनाथ पाटील सर्व रा. मु. झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस फरोक्त साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ०३/०६/ २०२४

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता- श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग, रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राह्मण आळी, अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड, गट नं. ३३४/३, एकूण क्षेत्र ०-२२-०० हे. आर., आकार ५.४० रू.पै. ही मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक १) रेखा रमाकांत गुरव २) राजेश रमाकांत गुरव ३) रूपेश रमाकांत गुरव ४) आशा तुकाराम गुरव सर्व रा. मु. झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ०३/०६/२०२४

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग, रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राह्मण आळी, अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-भायमळा ता. अलिबाग, जिल्हा-रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीबाबत आमचे खरेदीदार यांनी जमिन मालकांबरोबर बोलणी करुन जमिन मालकांनी सदर मिळकत ही निर्वेध व बोजा विरहीत असल्याची खात्री व भरवसा आमचे खरेदीदार यांना देवून खरेदीदार यांचे बरोबर खालील मिळकती संदर्भात विसार पावती लिहून देवून व्यवहार ठरवून खरेदीदार यांना खालील वर्णनाची जमिन मिळकत कायम खरेदीने कायम स्वरुपी मालकी हक्काने विकत देण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन- मौजे भायमळा, ता. अलिबाग जिल्हा-रायगड येथील**

| जमिन मालकाचे नाव | गट/हि.नं. | क्षेत्र (हे.आर.) | पोटखराबा (हे.आर.) | आकार |
|---|---|---|---|---|
| सौ.मनिषा रेमावरन नायर | १०५/१ | ०-२३-०० | ०-०३-८० | ३-४४ रु. |

वरील मिळकतीबाबत कोणाचेही कसलेही हक्क, हितसंबंध, वहिवाटीचा मार्ग, बोजा, गहाणखत, दान, बक्षिस, भाडेपट्टाकरार, साठेकरार, बयाणापावती, कुलअखत्यारपत्र, किंवा कसल्याही प्रकारचे अन्य हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध तारखेपासून पंधरा दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे प्रत्यक्ष लेखी कागदपत्रांसहीत सादर करुन आमची खात्री पटवून द्यावी मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून आमचे खरेदीदार हे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती या आमचे खरेदीदार यांचेवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण :- भायमळा ता. अलिबाग
दिनांक - ३-०६-२०२४

सही/-
**रायंदेकर कन्सलटंसी**
**श्री. सी.एच. रायंदेकर (पाटील) (बीकॉमएलएलबी)**
**मु. रायंदे (चरी) पो.-पोयनाड, ता. अलिबाग रायगड**
**मो. ९२२६२७२०७८, ९०४९७७४२२७**

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस ह्या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील नमूद मिळकत, सदर मिळकतीचे विद्यमान मालक सौ. कविता शरद जगे, श्री. संजय पंढरीनाथ पाटील व सौ. प्रियदर्शनी संजय पाटील, यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे, त्या संदर्भात आमचे अशिल व विदयमान मालक यांचे दरम्यान तोंडी स्वरुपाची बोलणी झालेली आहेत. सबब सदर खालील नमूद मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी, माझे अशिल यांचे सूचनेनुसार आज रोजी सदर जाहिर नोटीस प्रसिध्द करीत आहोत.

संदर्भित जमीन मिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्या दिनांकापासून १४ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानीशी देवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतींचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन कं. | क्षेत्र | आकार (रु.पै.) | भुधारणा पध्दत |
|---|---|---|---|---|
| चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड | ५९/२/४ | २.६४.०० (आर.चौ.मी) | २६.४० | बिनशेती |
| चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड | ५९/२/५ | २.७६.०० (आर.चौ.मी) | २७.६० | बिनशेती |
| चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड | ५९/२/६ | २.९३.०० (आर.चौ.मी) | २९.३० | बिनशेती |
| चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड | ५९/१/ब | ०-१५-५० (हे.आर.चौ.मी) | ०.९१ | शेती |

अलिबाग,
दि. ०३/०६/२०२४

सही/-
**ॲड. महेश सुहास म्हात्रे**
**ॲडव्होकेट**
**ऋतुराज प्लाझा, तळमजला, फ्लॅट क्रमांक १. छ. शिवाजी चौक, गावडे ऑप्टिक्स जवळ, अलिबाग रायगड**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की रोमिक रमेश पटेल, रा. नेरूळ नवी मुंबई यांनी मौजे उंबर्डे, ता.पेण लक्ष्मण शंकर पाटील अणि इतर यांच्या मालकीची मिळकत कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे, त्याचे वर्णन खालीलप्रमाणे....

| गाव | मालक | गट क्रमांक व उपविभाग | भुधारणा पध्दती | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|---|
| उंबर्डे | लक्ष्मण शंकर पाटील आणि इतर | २१/२ | भो वर्ग २ | ०-३५-२० पो.ख.०-०५-३० एकूण ०-४०-५० | ८.६२ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकत मी स्वता: कायमस्वरूपी विकत घेत आहे. तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ, वहीवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, गहाणखत, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रातील दान, जप्ती, लीज अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटिस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाच्या आत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास मी स्वत: जमिन मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीखत करेल व मागाहुन येणारी कोणतीही हरकत माझ्यावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

पेण
दि. ०४/०६/२०२४

**रोमिक रमेश पटेल,**
रा.नेरूळ नवी मुंबई,
मो. ९३७०८७२४०६

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी श्री. लालचंद सिताराम राजपुत यांच्या खालील वर्णन केलेल्या मिळकती विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | मौजे | सर्व्हे नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| १) | पाल्हे | ६० | ०.५६.१० पो.ख. ०.०१.८० एकुण ०.५७.९० | २.५६ |
| २) | पाल्हे | ६३ | ०.८३.०० पो.ख. ०.०३.५० एकुण ०.८६.५० पैकी क्षेत्र ०.२०.०० | ५.५२ |
| ३) | पाल्हे | ६४ | ०.८७.५० पो.ख. ०.०१.५० एकुण ०.८९.०० पैकी क्षेत्र ०.२१.०० | ६.८४ |

सदरहु मिळकती या श्री. लालचंद सिताराम राजपुत, रा. नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड यांचे ताबेकब्जाची व मालकीची आहे असे ते सांगतात व विद्यमान ७/१२ उताऱ्यावरून ते दिसते. सदर मिळकती त्यांचेकडून आमचे अशिलांनी तद्‌भूत सर्व हक्कांगासह कायम खरेदी घेण्याच्या ठरविले आहे. तरी सदर मिळकतींत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, खरेदी, लिज वगैरे प्रकारचा हक्क वा कुळ हक्क, अन्न, वस्त्र, बोजा असल्यास त्याने तसे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील पत्त्यावर लेखी कळवावे. वरील मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास मिळकती निर्वेध असल्याचे समजून खरेदीखत रजिस्टर केले जाईल व मागाहून येणारी कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

अलिबाग
ता. ०३/०६/२०२४

**ॲड. पंकज नारायण देशमुख,**
रा. शंकर राम कॉम्प्लेक्स, शॉप नं. ५,
आय.डी.बी.आय.बँकेसमोर, पेण ता. पेण, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेली मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्रीमती अपर्णा विठ्ठल पाटील, वगैरे यांचेकडून खरेदी घेणेचे निश्चित केले आहे. सदर मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका अलिबाग, मौजे कार्ले, ता. अलिबाग येथील :-**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हेक्टर आर. चौरस मिटर | आकार रू.पै. |
|---|---|---|
| ६९ | ०-१३-७० | ३.२५ |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दिनांक :- ०४/०६/२०२४

**ॲड. अक्षय सुधीर म्हात्रे**
'अन्नपूर्णा', मु. पो. धोकवडे,
ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे **वरई तर्फे वरेडी**, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे मालक १ **विजय करुणाशंकर पाठक व २) लक्ष्मी विजय पाठक** यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

मौजे वरई तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील सर्व्हे नं. २१ हिस्सा नं. १२ एकूण क्षेत्रफळ २-६४-०० हे.आर.आकार १-५९ रु. पै. यापैकी राजहंस कृषी फलोद्यान विकास सहकारी संस्था मर्यादित या संस्थेचा प्लॉट नं. ३१ क्षेत्र ४२५१ चौ. मी. व संस्थेचे भाग क्र. १११ ते ११५

सबब सदरबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, लिज, लिन, बक्षीस, करार, ताबेकब्जा, वहिवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून १० दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतेही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दि.०४/०६/२०२४.

**ॲड.सतीश धर्मा डायरे,**
पत्ता- ००२, शिवतीर्थ, सहयोग को.ऑ.हौ.सो.ब्राह्मण आळी, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.
मो.९८५०४०२६५७.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटिसद्वारे कळविण्यात येते की, मौजे पोयनाड, ता.अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची वडिलोपार्जित सामाईक मिळकत आमचे अशिल यांनी मिळकतीचे मालक श्री. शंकर बाळू पाटील हयांचेकडून त्यांचा सदर सामाईक मिळकतीमध्ये असणारा अविभक्त हिस्सा खरेदी करण्याचे ठरविले असून आमचे अशिल व विद्यमान मालक ह्यांच्यामध्ये सदर मिळकतीच्या व्यवहाराबाबत बोलणी झालेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे पोयनाड, ता. अलिबाग जि. रायगड येथील भूमापन क्र. व उपविभाग ४५, एकूण क्षेत्र ०-३८-०० हे. आर. आकार रु. पैसे ०.७०

तरी वर नमुद मिळकतीबाबत अन्य कोणत्याही इसमाचा संस्थेचा, साठेकरार, कुळवहिवाट, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, गहाण, तारण, भाडेपट्टा या अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी लेखी पुराव्यासह आपल्या हरकती खालील पत्त्यावर सदर नोटिस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात सादर कराव्यात. सदर मुदतीत अशा प्रकारच्या कोणत्याही हरकती न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण होईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची याद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : ०३/०६/२०२४

सही/-
**ॲड. अभिजीत बाळाराम पाटील**
रा. घर क. २१५, वालवडे, पांडवादेवी देहेनरोड
पो. शहाबाज, ता. अलिबाग, जि. रायगड.
मो. नं. ७३९१९९६०३०

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल **बिल्ड वेल इंटरप्रायझेस, तर्फे भागीदार १. सलमान इक्बाल पटेल, २. शावेज इक्बाल पटेल** यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक **सौ. दिपाली नंदकुमार कुलकर्णी वगैरे १२** यांचे कडून विकत घेण्याचे ठरवीले आहे.
**मिळकतीचे वर्णन मौजे. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ३२ | १ | ०-५५-६० पो.ख. ०-०२-३० | १०-८२ |
| ३२ | २ | ०-१६-०० पो.ख.०-०४-०० | ३-१२ |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **एक महिन्यांचे** आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे

दि. ०४/०६/२०२४.

**ॲड. नरेश रामदास आहीर.**
पत्ता - शॉप नं. १२, शिवगंगा अपार्टमेंन्ट, ब्राह्मणआळी,
नेरळ ता. कर्जत, जि. रायगड
मो. - ९३२५०६००३७/९०११२९२९८७.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुलमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :-**
**परिशिष्ट**
**मौजे बोरगाव, ता. कर्जत जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत:-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र. हे.आर.-पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १) श्री. राजेश सुरेश देशमुख, २) श्री. शफी शब्बीर खान ३) अली इरफान नेमतुल्ला कुरेशी | १०१ | ५ | १-३९-० | ० | ५६ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४, चौथा मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालीका कार्यालयाशेजारी, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :-०४/०६/२०२४
मो. नं. ९०२८९८२२७७
ई मेल:-adv.jayeshmhase@gmail.com

**निवडक**

### केदार जाधव निवृत्त

**मुंबई :** भारतीय संघाचा अष्टपैलू फलंदाज केदार जाधवने क्रिकेटच्या सर्व फॉरमॅटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांनी ही माहिती दिली. ३९ वर्षीय खेळाडूने भारतासाठी शेवटचा सामना ८ फेब्रुवारी २०२० रोजी न्यूझीलंडविरुद्ध खेळला होता. केदार जाधवने २०१४ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. त्याने १६ नोव्हेंबर २०१४ रोजी रांची येथे श्रीलंकेविरुद्ध पहिला एकदिवसीय सामना खेळला होतो. ७३ एकदिवसीय सामन्यांमध्ये जाधवने १३८९ धावा केल्या.

### खेळाडूचा दुर्दैवी मृत्यू

**मुंबई :** क्रिकेटमध्ये अनेकदा खेळाडू मैदानात खेळताना दुखापतग्रस्त होत असतात. पण खूप क्वचितच एखाद्याला आपला जीव गमवावा लागला आहे. तथापि, अशीच एक दुर्दैवी घटना मुंबईमध्ये घडली आहे. सोशल मीडियावर सध्या एक व्हिडिओ व्हायरल होत आहे. त्यात दिसतेय की गोलंदाज अंडरआर्म गोलंदाजी करत असून त्यावर फलंदाजाने षटकार मारला. यावेळी तो चेंडूकडे पाहात असताना अचानकच तो खाली कोसळला. दरम्यान, या घटनेनंतर त्या फलंदाजाला जीव गमवावा लागल्याचे समजत आहे.

### युएसएमधील पोलीस सज्ज

**न्युयॉर्क :** टी-२० विश्वचषकात सर्वात हाय व्होल्टेज सामना हा ९ जून रोजी न्यूयॉर्क येथे होणार आहे. भारत-पाकिस्तान हे दोन पारंपरिक कट्टर प्रतिस्पर्धी एकमेकांना भिडणार आहेत. सामन्यादरम्यान प्रेक्षकांचा उत्साह जेवढा टिपेला असतो तेवढाच सुरक्षेचा प्रश्न देखील महत्वाचा असतो. आता भारत-पाकिस्तान सामन्यात कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून युएसएमधील पोलीस सज्ज झाले आहेत. सुरक्षा उपायांमध्ये स्निपरसह टीमचा समावेश असेल. मैदानात साध्या वेशातील पोलीस अधिकारीही तैनात असतील.

### रियानची तिखट प्रतिक्रिया

**नवी दिल्ली :** डोमेस्टिक क्रिकेटमध्ये आसाम संघामध्ये चांगली कामगीरी करत पुन्हा तिच लय आयपीएलमध्ये दाखवून रियान पराग चांगलाच चर्चेत आला आहे. आता पून्हा एकदा रियानने टी-२० विश्वचषकाबाबत वादग्रस्त विधान केले आहे. रियान परागला जेव्हा आगामी विश्वचषकासाठी टॉप-४ संघ काय असतील याबद्दल विचारले असता, मला टी-२० विश्वचषक पाहण्यात कोमताही रस नाही. जेव्हा विश्वचषकासाठी माझी निवड होईल तेव्हा मी पाहीन आणि त्यावेळी टॉप-४ संघाबद्दल विचार करेन.

### जुमा मीयागीचा संघर्ष

**न्युयॉर्क :** यंदाच्या टी-२० विश्वचषकात एकूण २० संघ खेळत आहेत. यावेळी तीन नवीन संघांनी पदार्पण केले आहे, ज्यामध्ये आफ्रिकेतील युगांडा या देशाच्या संघाचाही समावेश आहे. युगांडाच्या जुमा मियागी या खेळाडूला टी-२० विश्वचषक खेळण्यासाठी खूप संघर्ष करावा लागला. मियागी २१ वर्षांचा असून वेगवान गोलंदाज आहे. मयागी याला राहण्यासाठी घर नव्हते. तो झोपडपट्टीत राहत होता. येथून निघून युगांडा क्रिकेट संघात सामील होणे त्याच्यासाठी अजिबात सोपे नव्हते.

# विश्वचषकात रंगला ‘सुपर’ थरार

## ओमानची नामिबियाला कडवी झुंज



**। ब्रिजटाउन । वृत्तसंस्था ।**
**सोमवारी टी-२० विश्वचषकातील तिसरा सामना ओमान आणि नामिबिया यांच्यात खेळला गेला. या सामन्यात चाहत्यांना सुपर ओव्हरचा थरार पाहायला मिळाला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना ओमानचा संघ १९.४ षटकात १०९ धावांवर ऑलआऊट झाला. त्यानंतर, नामिबियाचा संघ हा सामना सहज जिंकेल असे वाटत होते. पण ओमान संघाने नामिबियाला कडवी झुंज दिली आणि सामना सुपर ओव्हरमध्ये गेला.**

छोट्या लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या नामिबियाच्या संघाची सुरुवात खूपच खराब झाली. जेव्हा सलामीवीर मायकेल वॉन लिंगेन खाते न उघडता पॅव्हेलियनमध्ये परतला. मात्र, यानंतर निकोलस डेव्हलिन आणि जॉन फ्रायलिंक यांनी चांगली फलंदाजी केली. निकोलसने २४ आणि फ्रायलिंकने ४५ धावा केल्या. कर्णधार गेरहार्ड इरास्मसला केवळ १३ धावा करता आल्या. शेवटच्या चेंडूवर नामिबियाला विजयासाठी २ धावांची गरज होती. पण संघ केवळ एक धावा करू शकला. अशा प्रकारे दोन्ही संघांमध्ये सुपर ओव्हर झाली.

सुपर ओव्हरमध्ये नामिबियाच्या संघाने प्रथम फलंदाजी करताना केवळ २१ धावा केल्या. सुपर ओव्हरमध्ये डेव्हिड वीसने १३ आणि कर्णधार गेरहार्ड इरास्मसने ८ धावा केल्या. यानंतर डेव्हिड वीसने सुपर ओव्हरमध्ये नामिबियाच्या गोलंदाजीची जबाबदारीही घेतली. तिसऱ्या चेंडूवर त्याने नसीम कुशीचा बळी घेतला आणि सुपर ओव्हरमध्ये केवळ १० धावा दिल्या. अशा प्रकारे सुपर ओव्हरमध्ये नामिबियाने सामना जिंकला. सामन्यातील उत्कृष्ट कामगिरीसाठी डेव्हिड वीसला सामनावीराचा पुरस्कारही देण्यात आला. नामिबियाने सुपर ओव्हरमध्ये विजय मिळवून टी-२० विश्वचषकाची शानदार सुरुवात केली.

२०१२ नंतर टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात सुपर ओव्हरमध्ये सामन्याचा निर्णय होण्याची ही दुसरी वेळ आहे. १२ वर्षांपूर्वी २०१२ च्या टी-२० विश्वचषकात पल्लेकेले येथे न्यूझीलंड आणि वेस्ट इंडिज यांच्यात खेळलेला सामना सुपर ओव्हरमध्ये गेला होता, जो कॅरेबियन संघाने जिंकला होता.

### ट्रम्पेलमॅनची ऐतिहासीक कामगीरी

**या सामन्यात नामिबियाच्या रुबेन ट्रम्पेलमॅनने अप्रतिम कामगिरी केली आहे. जी भारतीय संघाच्या जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद शमीला देखील करता आली नाही. त्याने उत्कृष्ट गोलंदाजीच्या जोरावर एक मोठा विक्रम केला आहे, जो आधी कोणत्याही खेळाडूला करता आलेला नाही. रुबेन ट्रम्पेलमॅनने पहिल्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर ओमानच्या कश्यप प्रजापतीला आणि यानंतर दुसऱ्या चेंडूवर ओमानचा कर्णधार आकिब इलियासला आऊट केले. टी-२० सामन्याच्या पहिल्या दोन चेंडूत दोन विकेट घेणारा रुबेन ट्रम्पेलमॅन हा क्रिकेटच्या इतिहासातील पहिला खेळाडू ठरला आहे.**

## साहेबांच्या खेळात भारतीयांची मक्तेदारी

**। न्युयॉर्क । वृत्तसंस्था ।**

टी-२० विश्वचषकाला धमाकेदार सुरुवात झाली असून आयसीसीच्या या मेगा इव्हेंटमध्ये भारतीय वंशाचे अनेक क्रिकेटपटू दुसऱ्या देशांकडून खेळत आहेत. अमेरिकेच्या क्रिकेट संघात कर्णधार यष्टीरक्षक फलंदाज मोनांक पटेल तसेच हरमीत सिंग, मिलिंद कुमार, निसर्ग पटेल, नितीश कुमार आणि सौरव नेत्रावलकर असे तब्बल ६ भारतीय वंशाचे क्रिकेटपटू आहेत. न्यूझीलंड क्रिकेट संघात भारतीय वंशाचा रचिन रवींद्र एकच क्रिकेटपटू आहे. दक्षिण आफ्रिकेच्या क्रिकेट संघात केशव महाराज हा एक भारतीय वंशाचा क्रिकेटपटू आहे. युगांडा क्रिकेट संघात भारतीय वंशाचे अल्पेश रामजानी आणि रौनक पटेल हे दोन खेळाडू आहेत. कॅनडाच्या संघात रवींद्रपाल सिंग, निखिल दत्ता, परगट सिंग आणि श्रेयस मोव्वा हे चार भारतीय वंशाचे खेळाडू आहेत. ओमानच्या संघातही कश्यप प्रजापती या एका भारतीय खेळाडूचा समावेश आहे.

## वेस्ट इंडिजची विजयी सलामी

**। गयाना । वृत्तसंस्था ।**

टी-२० विश्वचषक स्पर्धेत रविवारी (दि.२) दुसरा सामना यजमान वेस्ट इंडिज आणि पापुआ न्यु गिनी संघात झाला. गयाना येथे झालेल्या या सामन्यात वेस्ट इंडिजने ५ गडी राखुन विजय मिळवला. यासह वेस्ट इंडिजने या स्पर्धेच्या मोहिमेला विजयाने सुरुवात केली. या सामन्यात पापुआ न्यु गिनीने वेस्ट इंडिजसमोर १३७ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग वेस्ट इंडिजने १९ षटकात ५ गडी गमावत पूर्ण केला.

१३७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना विंडिजसाठी सुरुवात फारशी चांगली झाली नव्हती. त्यांनी दुसऱ्याच षटकात सलामीवीर जोन्सन चार्ल्सची शुन्यावर विकेट गमावली. पहिल्या विकेटनंतर ब्रेंडन किंग आणि निकोलस पूरन यांनी संयमी खेळ करत अर्धशतकी भागीदारी केली होती. अखेर ही भागीदारी जॉन कारिकोने तोडली. त्याने पूरनला २७ धावांवर बाद केले. यानंतर ब्रेंडनला असाद वालाने ३४ धावांवर बाद केले. त्यानंतर पॉवेल (१५) आणि शेरफेन (२) झटपट बाद झाल्याने विंडिज दबावात आले होते. परंतु, अखेरीस रोस्टनने आंद्रे रसेलला साथीला घेत आक्रमक खेळ केला. त्यामुळे वेस्ट इंडिजने १९ व्या षटकात विजय निश्चित केला.



## सोलापुरात आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्टेडिअम

### अपुऱ्या सुविधांमुळे सामने अशक्य



**। सोलापूर । प्रतिनिधी ।**

सोलापूर येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडिअमवर जानेवारीत दोन रणजी सामने पार पडल्यानंतर आयपीएल किंवा एमपीएलचे क्रिकेट सामने होतील, अशी सोलापूरकरांना आशा होती. मात्र, जिल्हा क्रिकेट असोसिएशनने त्यासाठी प्रयत्न करूनही अपुरी प्रेक्षक क्षमता आणि डे-नाईट सामन्यासाठी लागणारी फ्लड लाइट नसल्याने सोलापुरात ते सामने अशक्य असल्याचे सांगण्यात आले. त्या सुविधांसाठी आता असोसिएशनचा पाठपुरावा सुरू झाला आहे.

सोलापूर जिल्ह्यात क्रिकेटकडे अनेकांचा कल वाढू लागला आहे. स्मार्ट सिटीतून जवळपास १६ कोटी रुपयांचा खर्च करून सोलापुरातील इंदिरा गांधी पार्क स्टेडिअम आंतरराष्ट्रीय दर्जाचे करण्यात आले आहे. त्यानंतर याच मैदानावर तब्बल २९ वर्षानंतर महाराष्ट्रविरूद्ध मणिपूर आणि महाराष्ट्रविरूद्ध सौराष्ट्र असे दोन सामने रणजी सामने पार पडले. मैदानावर स्क्रीन लावून दरवर्षी आयपीएल किंवा टी-२०चे क्रिकेट सामने पाहाणाऱ्या सोलापूरकरांना आता प्रत्यक्षात आपल्या इंदिरा गांधी पार्क स्टेडिअमवर टी-२०चे किंवा आयपीएल, एमपीएलचे सामने प्रत्यक्षात पाहता येतील, अशी आशा वाटू लागली आहे.

## विद्यार्थ्यांकरिता कबड्डी प्रशिक्षण शिबीर

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

सचिंद्र आयरे फाऊंडेशन व लालबागचा राजाच्या आशिर्वादाने शालेय विद्यार्थ्यांसाठी १ व २ जून रोजी कबड्डी खेळाचे दोन दिवसांचे विनामूल्य प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्याची सांगता माया मेहेर यांच्या हस्ते झाले. यावेळी तारक राऊळ, रवींद्र सुर्वे, भार्गव कदम, सचिंद्र आयरे, मिलिंद कोलते, संदीप काणेकर, अशोक लोटणकर, सुरेश गोरिवले आदी मान्यवर उपस्थित होते. या खेळाडूंना मिलिंद कोलते, मोरे यांनी खेळाचे प्रशिक्षण दिले. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन पांडुरंग भोगले यांनी केले.



## ज्युनियर क्रिकेट स्पर्धेचे बक्षिस वितरण



**। पनवेल । क्रीडा प्रतिनिधी ।**

पनवेल येथील कर्नाळा स्पोर्ट्सच्या क्रीडांगणावर क्रिकेट अकॅडमी ऑफ पठाण यांनी आयोजित केलेल्या बारा व चौदा वर्षांखालील ज्युनियर वयोगटातील क्रिकेट स्पर्धेच्या बक्षिसवितरणांचा कार्यक्रम रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे नवनिर्वाचित अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी बारा वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत प्रतिक क्रिकेट अकॅडमी पनवेल यांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर, पाचुरी क्रिकेट अकॅडमी कामोठे यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. यावेळी सामनावीर पार्थ जंगम, फायटर ऑफ दि मॅच आर्यन कुमार, उत्कृष्ठ क्षेत्ररक्षक आर्य म्हात्रे, उत्कृष्ट फलंदाज विघ्नेश पाटील, उत्कृष्ठ गोलंदाज द्रुव दिगंबर, मालिकावीर यजुर्वे घरत यांना सन्मानित करण्यात आले.

चौदा वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत अंतिम विजयी संघ बी.पी. पाटील क्रिकेट अकॅडमी खारघर, द्वितीय क्रमांक नक्षत्र क्रिकेट अकॅडमी डोंबिवली, तर अंतिम सामन्यातील सामनावीर म्हणून शाश्वत नाईक, फायटर ऑफ दि मॅच दक्ष माळी, उत्कृष्ठ क्षेत्ररक्षक विनीत डोळस, उत्कृष्ठ फलंदाज शाश्वत नाईक, उत्कृष्ठ गोलंदाज ओम पाटील, मालिकावीर करण कांबळे यांना सन्मानचिन्हे देऊन गौरविण्यात आले. बक्षिसवितरणाच्या कार्यक्रमासाठी जिल्हा अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, जयंत नाईक, राजेश पाटील, अँड. पंकज पंडित, शंकर दळवी, के. सीताराम, अमोल गुंड, जयवंत पाटील, सागर घरत सह युवा खेळाडू व पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रमीझ राजाची पाक संघावर टीका

**लाहोर :** पाकिस्तानी संघ विश्वचषकासारख्या मोठ्या व्यासपीठावर खेळत असताना त्यांना माजी खेळाडूंच्या रोषाचा सामना करावा लागत आहे. टी-२० विश्वचषकाच्या तोंडावर शेजाऱ्यांना इंग्लंडकडून टी-२० मालिकेत ०-२ असा दारूण पराभव पत्करावा लागला. या पराभवानंतर पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचा माजी अध्यक्ष रमीझ राजाने बाबर आझमच्या संघावर सडकून टीका केली होती. अशातच आता संघाचा माजी खेळाडू अहमद शहजादने बाबरला खुले आव्हान दिले आहे. त्याचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे.

अहमद शहजादने म्हटले की, लोकांनी खूप संयम बाळगला आहे. पण आम्ही क्रिकेटशिवाय कोणत्याच मुद्द्यावर भाष्य केले नाही. तो (बाबर आझम) स्वत:ला मोठा खेळाडू समजतो. असे असेल तर त्याने पाकिस्तानला विश्वचषक जिंकून द्यायला हवा. त्याला पाच मोठ्या स्पर्धांमध्ये खेळण्याची संधी मिळाली आहे. संघात ज्या प्रकारे दलालांच्या माध्यमातून खेळाडूंना संधी मिळत आहे हे लवकरच आम्ही उघड करू.

## किरॉन पोलार्ड इंग्लंडच्या ताफ्यात

**। बार्बाडोस । वृत्तसंस्था ।**





वेस्ट इंडिजचा माजी कर्णधार आणि स्टार अष्टपैलू किरॉन पोलार्ड टी-२० विश्वचषकात इंग्लंडच्या विजयासाठी झटताना दिसेल. पोलार्ड सहकारी प्रशिक्षक म्हणून इंग्लिश संघासोबत कार्यरत आहे. ३७ वर्षीय पोलार्ड इंग्लिश संघाच्या सराव सत्रात बार्बाडोस येथे दिसला होता. गतविजेच्या इंग्लंडने अलीकडेच पाकिस्तानविरूद्ध २-० ने मोठा विजय मिळवला.

डिसेंबर २०२३मध्ये मॅथ्यू मॉटचा कार्यकाळ संपल्यानंतर पोलार्डने इंग्लंड बोर्डाने आपल्या संघाचा फलंदाजी प्रशिक्षक बनवले. पोलार्डच्या मार्गदर्शनाखाली इंग्लिश संघ अमेरिका आणि वेस्ट इंडिज येथे होत असलेला टी-२० विश्वचषक खेळत आहे. पोलार्डच्या मायदेशात होत असलेल्या विश्वचषकामुळे त्याला तेथील मैदानांचा अंदाज आहे. पोलार्डने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १०१ टी-२० सातन्यांमध्ये कॅरेबियन संघाचे प्रतिनिधित्व केले आहे. २०१२ मध्ये संघाच्या टी-२० विश्वचषक जिंकण्यात त्याने महत्त्वाची भूमिका बजावली आणि २०२१च्या आवृत्तीत तो कर्णधार म्हणून खेळला. २०२२ मध्ये त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली असली तरी, पोलार्ड जगभरातील अनेक टी-२० फ्रँचायझी लीगमध्ये सक्रिय आहे आणि वेगवेगळ्या भूमिका बजावत आहे.

### कमिन्सचा मोठा निर्णय

**नवी दिल्ली :** हैदराबादचा कर्णधार पॅट कमिन्सने यंदाच्या आयपीएलमध्ये जबरदस्त कामगिरी केली होती. त्याच्या नेतृत्वाखाली त्यानेहैदराबादला अंतिम फेरीत नेले. आता कमिन्सने मोठा निर्णय घेतला आहे. त्याने अमेरिकेतील मेजर लीग क्रिकेटमध्ये खेळण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये कमिन्स सॅन फ्रान्सिस्को संघाकडून खेळताना दिसणार आहे. गेल्या हंगामात आरोन फिंच सॅन फ्रान्सिस्को संघाचा कर्णधार होता पण आता तो निवृत्त झाला आहे. आणि त्यामुळेच कमिन्सची नियुक्ती करण्यात येणार आहे.

## मला प्रशिक्षक बनायला आवडेल

### गंभीरने केली भूमिका स्पष्ट





**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

मागील काही दिवसांपासून क्रिकेट विश्वात एकच चर्चा रंगली आहे ती म्हणजे भारतीय क्रिकेट संघाचा मुख्य प्रशिक्षक. भारतीय क्रिकेट नियामक मंडळ अर्थात बीसीसीआयने या पदासाठी अर्ज मागवले आहेत. या पदाच्या शर्यतीत माजी खेळाडू गौतम गंभीर आघाडीवर आहे. आता खुद्द गंभीरने याबद्दल मौन सोडले असून, आपली भूमिका स्पष्ट केली आहे. राष्ट्रीय संघाचा प्रशिक्षक होण्यापेक्षा कोणता मोठा सन्मान नाही, असे गंभीरने सांगितले.

गंभीर म्हणाला की, तुमच्या राष्ट्रीय संघाचे प्रशिक्षक होण्यापेक्षा मोठा सन्मान नाही. या पदावर असताना तुम्ही १४० कोटी भारतीयांचे आणि जगभरातील लोकांचेही प्रतिनिधित्व करत असता. जेव्हा तुम्ही भारताचे प्रतिनिधित्व करत असता. तेव्हा यापेक्षा मोठा सन्मान तो काय असू शकतो? पण मी भारताला विश्वचषक जिंकण्यासाठी कशी मदत करू शकतो? मला वाटते की भारताला विश्वचषक जिंकण्यास मदत करणारे १४० कोटी भारतीय आहेत. जर प्रत्येक भारतीय आमच्यासाठी प्रार्थना करू लागला आणि आम्ही त्यांचे प्रतिनिधित्व करू लागलो तर भारत विश्वचषक जिंकेल यात शंका नाही. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे निर्भय असणे गरजेचे आहे. जर तुम्ही मला विचाराल तर होय, मला भारतीय संघाचे प्रशिक्षक बनायला आवडेल.

सध्या भारतीय संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी राहुल द्रविड आहे, परंतु त्याचा कार्यकाळ जून २०२४ मध्ये संपणार आहे. तसेच तो पुन्हा अर्ज करणार नसल्याचे म्हटले जात आहे.

# भारतीय बॉक्सर्सची नेत्रदीपक कामगिरी

***। बँकॉक । वृत्तसंस्था ।***
***अमित पंघाल व जास्मिन या भारतीय बॉक्सर्सनी रविवारी भारतासाठी नेत्रदीपक कामगिरी करताना पॅरिस ऑलिम्पिकचा कोटा मिळवून दिला. अमितने पुरुष विभागातील ५१ किलो वजनी गटात, तर जास्मिनने महिला विभागातील ५७ किलो वजनी गटात प्रतिस्पर्ध्यांना ठोसा लगावत भारताचा बॉक्सिंग या खेळातील अनुक्रमे पाचवा व सहावा कोटा मिळवून दिला. थायलंडमधील बँकॉक येथे जागतिक पात्रता फेरीचे आयोजन करण्यात आले आहे.***

## प्रतिस्पर्ध्यांना ठोसा; मिळवला ऑलिम्पिकचा कोटा



अमित पंघाल याने उपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत चीनच्या लिऊ चुआंग याच्यावर ५-० असा सहज विजय मिळवला. जास्मिन हिला ५७ किलो वजनी गटात खेळावे लागले. परवीन हूडाला निलंबित केल्यामुळे जास्मिनची या वजनी गटासाठी निवड झाली. जास्मिन ही ६० किलो वजनी गटात सहभागी होत असे, पण निवड समितीचा निर्णय तिने सार्थ ठरवला. जास्मिनने मरीन कमारा हिच्यावर ५-० असा महत्त्वपूर्ण विजय संपादन केला. तीन खेळाडूंचे यशनिखत झरीन (५० किलो), प्रीती (५४ किलो), लवलीना बोर्गोहेन (७५ किलो) या तीन महिला बॉक्सर्सनी भारताला पॅरिस ऑलिम्पिकचा कोटा मिळवून दिला होता. आता या स्पर्धेमधून भारताला तीन खेळाडूंनी ऑलिम्पिकचा कोटा मिळवून दिला आहे. अमित पंघाल व जास्मिन यांच्याआधी निशांत देव याने ७१ किलो वजनी गटात कोटा मिळवून देण्याची कामगिरी केली आहे.

### प्ले ऑफमध्ये निराशा

**भारताला रविवारी आणखी एक ऑलिम्पिक कोटा मिळू शकला असता, पण थोडक्यासाठी हुलकावणी मिळाली. सचिन सिवाच याला ५७ किलो वजनी गटात निराशेला सामोरे जावे लागले. किर्गीस्तानच्या मुनारबेक सेतबेक उल याच्याकडून त्याला तिसऱ्या स्थानासाठीच्या प्ले ऑफ लढतीत हार पत्करावी लागली. सचिनचा ५-० असा पराभव झाला.**

**कृषीवल** हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)